# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक २० जुलै, २०२३ / आषाढ २९, १९४५ (शके)**

**(१) वैद्यकीय शिक्षण मंत्री**
**(२) ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री**
**(३) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**
**(४) कामगार मंत्री**
**(५) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
**(६) महिला व बालविकास मंत्री**
**(७) क्रीडा व युवक कल्याण मंत्री**
**(८) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७४**

---

### राज्यातील विशेषत: औरंगाबाद जिल्ह्यामधील गंगापूर तालुक्यातील अंगणवाड्यांना स्वमालकीच्या इमारती उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१) * १८८३९ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील बालविकास प्रकल्प-१ अंतर्गत २२९ तर बालविकास प्रकल्प-२ अंतर्गत २५५ अशा एकूण ४८४ अंगणवाड्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गंगापूर तालुक्यातील बालविकास प्रकल्प-१ व २ अंतर्गतच्या अंगणवाड्यांपैकी ३६० अंगणवाड्यांना इमारती असून, १२४ अंगणवाड्यांना स्वमालकीच्या स्वतंत्र इमारती नसल्यामुळे खाजगी जागेत भरविण्यात येतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, औरंगाबाद जिल्ह्यात एकूण ७२३ अंगणवाड्यांना स्वमालकीची इमारत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महिला व बालविकास विभागाच्या दिनांक ३१ जानेवारी, २०२२ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत किमान ३% इतका निधी कायमस्वरूपी उपलब्ध करणेबाबत मान्यता देण्यात आली असून, त्यामध्ये नवीन अंगणवाडी बांधकाम करण्याचे प्रावधान असून त्यानुषंगाने करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचे स्वरुप व सद्य:स्थिती काय आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील विविध जिल्ह्यात विशेषत: गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यासह औरंगाबाद जिल्ह्यातील अंगणवाड्यांना स्वत:च्या इमारती उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती आदिती तटकरे :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत : खरे आहे.

गंगापूर प्रकल्प -१ अंतर्गत २७ व गंगापूर प्रकल्प-२ अंतर्गत ९० अंगणवाड्या (एकूण ११७) यांना इमारती नसल्यामुळे सदर अंगणवाड्या या भाड्याची इमारत, समाज मंदीर, शाळा खोली इ.ठिकाणी भरविण्यात येतात.

(३) हे खरे आहे.

जिल्ह्यातील ७५६ अंगणवाड्यांना स्वत:ची इमारत नसून त्यापैकी ११६ अंगणवाड्या शाळेच्या खोलीत, ३३६ अंगणवाड्या समाज मंदिरात व ३०४ अंगणवाड्या भाड्याच्या खोलीत भरतात. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ५० अंगणवाडी इमारत बांधकामाकरीता प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

(४) महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय दिनांक ३१ जानेवारी, २०२२ अन्वये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत महिला व बालविकास सशक्तीकरण योजनेसाठी किमान ३ % इतका निधी कायम स्वरुपी उपलब्ध करणेबाबत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात मंजूर तरतुद प्राप्त होताच त्यामध्ये नवीन अंगणवाडी बांधकाम करणेस्तव प्रस्तावित करण्यात येणार आहे.

(५) सन २०२२-२३ अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ५० अंगणवाडी इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असून त्यामध्ये गंगापूर तालुक्यातील ८ अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामे मंजूर आहेत. सदरची बांधकामे प्रगतीपथावर आहेत. तसेच १३ व्या वित्त आयोगाकडून अंगणवाडी बांधकामाकरीता प्राप्त झालेल्या निधीपैकी अखर्चित निधीच्या प्रमाणात अंगणवाडी केंद्र इमारत बांधकाम करण्यात येणार आहे.

-----------------

## देवठाण (ता.अकोले,जि.अहमदनगर) येथील गावे तसेच वाड्यांसाठी जल जीवन योजनेंतर्गत नळ योजनांचे सुधारित सर्व्हेक्षण करण्याबाबत

**(२) * १९६५५ प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवठाण (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील तीन गावांसाठी व वाडी- वस्त्यांसाठी जल जीवन योजनेंतर्गत पिण्याच्या पाण्याकरीता होणाऱ्या नळ योजनेचे सर्व्हेक्षण ५०% चुकीच्या पध्दतीने केले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून, ग्रामस्थांनी पुन्हा सुधारित सर्व्हे करावा अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देवठाण येथील बारा वाड्यांसह दोडक नदी व वरखरवाडी या गावांना पिण्याच्या पाण्याच्या

नळ योजनेसाठी २५ कोटी रुपये खर्च केले जाणार असून, त्यात १९ पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांपैकी दहा टाक्या जुन्याच वापरणार असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सर्व्हे करण्याकरीता स्वतंत्र कंपनीची नेमणूक केली असल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याचे अधिकारी सदर प्रकरणाची जबाबदारी स्वीकारत नसल्याचे तसेच स्थानिकांना माहिती व योग्य ते मागदर्शन करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अहमदनगर जिल्हा परिषदेच्या जलजीवन मिशन अंतर्गत कामांच्या निविदा राबविताना प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या बदल्या करुन दुसऱ्या अधिकाऱ्यांची निवड करणे, सदरहू काम ठराविक ठेकेदाराला मिळण्याच्या दृष्टीने उक्त कामांच्या निविदा काढल्यानंतर त्या रद्द करणे, निविदा भरण्यासाठी चुकीचे कागदपत्र सादर करुन निविदांमधील अटी व शर्तीचा भंगही करणे इ.प्रकारे अनियमितता झाली असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त जल जीवन मिशन अंतर्गत कामांच्या निविदा राबविताना झालेल्या अनियमिततेबाबत संबंधित ठेकेदारांवर तसेच दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत तसेच देवठाण (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील पिण्याच्या पाण्याकरीता होणाऱ्या नळ योजनांचा पुन: सर्व्हे करुन नवीन टाक्या बांधण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर योजनेअंतर्गत समाविष्ट गावे व वाड्यासाठी सर्वेक्षण करुन रु. २४.९३ कोटीची मुळ योजना तयार करण्यात आली होती. यापुर्वीचे योजनेचे सर्वेक्षण योग्य असून, ग्रामस्थांनी वाढीव टाक्या, वितरण व्यवस्था व दुरच्या चार वाड्यापर्यंत पाईपलाईनची मागणी केली आहे. पुनर्सर्वेक्षण करुन सुधारित प्रस्तावात वरील बाबींचा समावेश करण्यात आला आहे. सुधारित अंदाजपत्रक अंतिम करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर देवठाण पाणी पुरवठा योजना, ता.अकोले, जि.अहमदनगर या योजनेची मंजूर किंमत रु.२४.९३ कोटी (ढोबळ) एवढी आहे. सदर योजनेमध्ये देवठाण गाव व दोडक नदी व वरखरवाडी सह इतर वाडयांचा समावेश आहे. मंजूर योजनेप्रमाणे एकूण आवश्यक 20 पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांपैकी ११ अस्तित्वातील टाक्या वापरणे प्रस्तावित आहे.

(३) हे खरे नाही,

सदर योजनेचे सर्व्हेक्षण करण्याकरीता तांत्रिक सल्लागाराची नेमणुक केलेली होती ही बाब खरी आहे. तसेच योजनेत समाविष्ट असलेल्या उपांगांची सविस्तर माहिती ग्रामसभेत दि.२१.४.२०२३ रोजी देण्यात आलेली आहे व सदरच्या कामावर कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.विभाग, संगमनेर यांनी दि.१.५.२०२३ रोजी पाहणी केलेली आहे. त्यानुसार योजनेचे काम सुरु झालेले आहे.

(४) हे खरे नाही.

अहमदनगर जिल्हा परिषदेच्या जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत कामाच्या निविदा राबविताना शासनाचे ई-महाटेंडर संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द करून नियमानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे. अनियमितता झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(५) सदर योजनेचे ग्रामस्थांच्या मागणी नुसार पुनर्सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. ग्रामस्थांच्या मागणी नुसार देवाचीवाडी, उघडेवाडी, देवठाण (गावठाण), दोडकनदी या ४ ठिकाणी अस्तित्वातील टाक्या ऐवजी ४ नविन टाक्या प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. सदर कामाचे फेर सर्व्हेक्षण पूर्ण करण्यांत आलेले आहे. सुधारित अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. या बाबत ग्रामस्थांना सविस्तर माहीती देण्यात आलेली आहे.

-----------------

## किनवट (जि.नांदेड) तालुक्यामध्ये स्वतंत्र स्त्री रुग्णालय सुरु करुन गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(३) * १९१४३ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव : तारांकित प्रश्न क्रमांक १७३२३ ला दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) या आदिवासी तालुक्यात स्वतंत्र स्त्री रुग्णालय स्थापन करण्याचा आयुक्त स्तरावर प्राप्त झालेला प्रस्ताव तसेच गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयाचे १०० खाटांच्या रुग्णालयात श्रेणीवर्धनाचा सुधारित प्रस्ताव असे दोन्ही प्रस्ताव शासनास प्राप्त झाले आहेत, हे खरे आहे काय
(२) असल्यास, अद्याप याबाबतचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाले नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने किनवट (जि.नांदेड) येथे स्वतंत्र स्त्री रुग्णालय व गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयाचे १०० खाटांच्या रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रस्ताव निकषात बसत नसल्याने अमान्य करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व मेयो रूग्णालयातील परिचारिकांची व चतुर्थ श्रेणी संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४) * १९४७१ श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व मेयो रूग्णालय येथे खाटांच्या संख्येत ८५० एवढी वाढ करूनही रूग्णालयातील मंजूर पदांपैकी परिचारिकांची १४५ व चतुर्थ श्रेणी संवर्गातील १६० पदे रिक्त असल्याचे दिनांक ५ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील परिचारीका व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.
(२) परिचारिकांची रिक्त पदे टी.सी.एस.- आय.ओ.एन. (टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस लिमिटेड) या कंपनीमार्फत भरण्याची कार्यवाही सुरू असून स्पर्धा परिक्षाही घेण्यात आली आहे. परिचारिकांची पदे भरण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

संस्थेतील वर्ग - ४ ची सरळसेवेची पदे जिल्हास्तरीय समितीमार्फत भरण्याबाबत कळविण्यात आले आहे. यास काही अवधी लागणार असल्याने शासन निर्णय दिनांक १८ मे, २०२३ अन्वये संस्थेतील वर्ग-४ ची १६५ पदे बाह्यस्त्रोतामार्फत भरण्यासाठी संस्थास्तरावर करण्यात आलेल्या करारास ६ महिने अथवा स्पर्धापरीक्षेच्या माध्यमातून नियमित पदे उपलब्ध होईपर्यंत जे आधी घडेल तो पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार संस्थेने वर्ग-४ ची रिक्त पदे बाह्यस्त्रोताद्वारे तात्पुरत्या स्वरूपात भरलेली आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## क्रीडा पुरस्कार विजेत्यांच्या यादीवर हरकती-सूचना मागविण्याबाबतचा निर्णय मागे घेण्याबाबत

**(५) * १९०५८ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) क्रीडा क्षेत्रातील कामगिरीबद्दल देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची प्राथमिक घोषणा राज्य शासनाच्या वतीने करण्यात आली असून सन २०१९ पासूनच्या पुरस्कार विजेत्यांची यादी क्रीडा विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असल्याचे माहे मे,२०२३ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुरस्कार यादीबद्दल हरकती व सूचना करण्यासाठी मुदत देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त नवीन पध्दत लागू करणे म्हणजे पुरस्कार मिळविणाऱ्यांचा जाहीर अपमान होत असल्याची भावना क्रीडा क्षेत्रामध्ये निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने सदर निर्णय मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) कोणत्याही पात्र खेळाडूवर अन्याय होऊ नये तसेच पात्र खेळाडू पुरस्कारापासून वंचित राहू नये, याकरीता शासन निर्णय दिनांक १४ डिसेंबर, २०२२ अन्वये प्रस्तावित पुरस्कार यादीबाबत हरकती व सूचना करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे पुरस्कार मिळविणाऱ्यांचा जाहीर अपमान होत आहे, हे म्हणणे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## राज्यातील कुपोषण व बालमृत्यू रोखण्याकरीता कायमस्वरुपी उपाययोजना करण्याबाबत

**(६) * १८९५३ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालविकास विभाग तसेच आरोग्य विभागाने केलेल्या सर्व्हेक्षणात राज्यातील ठाण्यासह कोकणात साडेसहा हजार बालके कुपोषित असून, ठाणे जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागात १८६९ बालके कुपोषित तर १८१ बालके ही तीव्र कुपोषित (सॅम) तर १६७१ बालके मध्यम स्वरूपाच्या (मॅम) कुपोषणाने ग्रस्त असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील आदिवासीबहुल जिल्ह्यात सन २०१९ - २०२२ या काळात कुपोषणामुळे ६ हजार ५८२ बालकांचा मृत्यू झाला असून, १ लाख ३६ हजार ७३३ मुलांमध्ये तीव्र आणि अतितीव्र कुपोषण आढळून आले असून, त्यापैकी १५ हजार २५३ मातांचे बालविवाह झाले असल्याची व सन २०२२-२३ च्या अहवालानुसार केवळ नंदुरबार जिल्ह्यात सुमारे २४००० बालके कुपोषित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महिला व बालविकास विभाग तसेच आरोग्य विभागाकडून कोकणातील सहा वर्षांपर्यंतच्या पाच लाख ३२ हजार ४९४ बालकांच्या करण्यात आलेला तपासणीत ६ हजार ४७ बालके मध्यम कुपोषित आढळून आली व ५३७ बालके तीव्र कुपोषित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रतिवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करूनही पोषण आहारासाठी पुरेशी तरतूद केली जात नसून कुपोषणाबाबत गाव व तालुका पातळीवरील समित्या अस्तित्वात नसणे, पालकांमध्ये जागरूकता नसणे, गरिबी तसेच शासनाचे उदासीन धोरण ह्या सर्व बाबींमुळे कुपोषणाची समस्या वाढत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नागरी व शहरी भागातील अति तीव्र कुपोषित बालकांना कुपोषण मुक्त करण्यासाठी शासनाने कायमस्वरुपी तत्वावर नागरी बालविकास केंद्रे सुरू करण्याच्या घेतलेल्या निर्णयानुसार आतापर्यंत किती बालविकास केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत, त्याचे स्वरुप काय आहे,

(६) असल्यास, नवसंजीवनीसारख्या मोठ्या योजना अस्तित्वात असतानादेखील कुपोषणाचे प्रमाण वाढण्याची कारणे काय आहेत तसेच याबाबतीत शासनाने पोषण आहारासाठी पुरेशी तरतुद करुन कुपोषणाची समस्या कायमस्वरुपी आटोक्यात आणण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती आदिती तटकरे :** (१) ठाणे जिल्ह्यामध्ये एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत १६ प्रकल्प कार्यरत आहेत. त्यापैकी नागरी व ग्रामीण भागात प्रत्येकी ८ प्रकल्प आहेत. माहे मार्च, २०२३ च्या मासिक प्रगती अहवालानुसार ठाणे जिल्ह्यातील नागरी व ग्रामीण प्रकल्पांची पोषण स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| **एकूण वजन घेतलेली बालके** | **सर्वसाधारण वजनाची बालके** | **मध्यम कमी वजनाची बालके** | **तीव्र कमी वजनाची बालके** |
|---|---|---|---|
| २६६०४९ | २४३००९ | २०३६१ | २६७९ |

ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील कार्यरत ८ प्रकल्पांमध्ये १८१ -SAM तर १६७१-MAM बालके आढळून आलेली आहेत.

(२) आरोग्य विभागाकडून दिनांक ६ जुलै, २०२३ रोजी प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार राज्यातील आदिवासी बहुल १६ जिल्हयांची वर्ष २०१९-२० ते मे २०२३ अखेर पर्यंतची बालमृत्यूची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| **२०१९-२०** | **२०२०-२१** | **२०२१-२२** | **२०२२-२३** |
|---|---|---|---|
| ९८१९ | ८९९० | ९०२४ | ९४५९ |

आदिवासी जिल्हयांतील जी बालके SAM आढळून आली आहेत त्यांच्या मातांच्या विवाहासंबंधी संबंधित जिल्हा कार्यक्रम अधिकाऱ्यांमार्फत माहे एप्रिल, २०२२ मध्ये सर्वेक्षण करुन घेण्यात आलेले आहे. सदर सर्वेक्षणामध्ये १५२५३ बाल विवाह झाल्याचे आढळून आले आहे. नंदुरबार जिल्ह्यामधील माहे मार्च, २०२३ नुसार कुपोषणाची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| **एकूण वजन घेतलेली बालके** | **सर्वसाधारण वजनाची बालके** | **मध्यम कमी वजनाची बालके** | **तीव्र कमी वजनाची बालके** |
|---|---|---|---|
| १४३११५ | ९८८८६ | ३४१३६ | १००९३ |

(३) अंशत: खरे आहे

माहे मार्च, २०२३ च्या मासिक प्रगती अहवालानुसार कोकणातील (मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, पालघर आणि सिंधुदुर्ग या सहा जिल्ह्याची) कुपोषण स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| **एकूण वजन घेतलेली बालके** | **सर्वसाधारण वजनाची बालके** | **मध्यम कमी वजनाची बालके** | **तीव्र कमी वजनाची बालके** |
|---|---|---|---|
| ९८३५८३ | ८८३४१९ | ८८६३६ | ११५२८ |

(४) एकात्मिक बालविकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून ५० टक्के केंद्र सरकारचा हिस्सा आहे व ५० टक्के राज्य शासनाचा हिस्सा आहे. केंद्र सरकार वेळोवेळी अनुदान उपलब्ध करुन देत असून राज्य शासनाकडूनही तरतुद उपलब्ध करुन दिली जात आहे. त्यामुळे पोषण आहारासाठी पुरेशी तरतुद केली जाते. जिल्हा पातळीवर व तालुका पातळीवर समित्या कार्यरत आहेत.

(५) ग्रामीण भागामध्ये सद्य:स्थितीत Severely Acute Malnourished (SAM) बालकांना सर्वसाधारण श्रेणीमध्ये आणण्यासाठी ग्राम बालविकास केंद्र सुरू आहेत. ग्रामीण भागाच्या धर्तीवर शहरी भागामध्ये नागरी बालविकास केंद्र सुरू करणे शासनाच्या विचाराधीन आहे.

(६) कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने खालील उपाययोजना करण्यात येतात.

१) एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत ६ महिने ३ वर्ष वयोगटातील बालकांना, गरोदर महिला, स्तनदा मातांना THR व ३ ते ६ वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

२) आदिवासी प्रकल्पामध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरु आहे. सदर योजनेंतर्गत गरोदर महिला व स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ दिवस अंडी व केळी देण्यात येतात. या ४ दिवसांमध्ये शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी व मांसाहारी बालकांसाठी १ अंडे देण्यात येते.

३) राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बालविकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बालविकास केंद्रामध्ये तीन वेळचा अतिरीक्त आहार व आरोग्य खात्यामार्फत औषधोपचार करण्यात येतात.

४) राज्यात पोषण अभियानांतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दी दृष्टीकोन (ILA) समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रिअल टाईम मॉनिटरींग (ICT-RTM) व जन आंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

-----------------

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय तसेच अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयांमधील अध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(७) * १९७३३ श्री.रमेश कराड, श्री.प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.जयंत आसगावकर, श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासन अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयांमध्ये सुमारे २७० पेक्षा अधिक अध्यापकांची विविध पदे गत सहा वर्षांपासून रिक्त असून, लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात प्राध्यापक व सहायक प्राध्यापकांची पदे रिक्त असल्याची बाब माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूरसह राज्यातील प्राध्यापकांच्या २१६ तर सहाय्यक प्राध्यापकांच्या ३०६ पदांच्या भरती प्रक्रियेस विलंब होत असून, कंत्राटी शिक्षकांना कायम करण्याची प्रक्रिया ही संथ झाली असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणासह रुग्णसेवेवर याचा परिणाम होत असल्याने मा.लोकप्रतिनिधी तसेच महाराष्ट्र राज्य वैद्यकीय शिक्षक संघटना यांनी लेखी तक्रार तसेच निवेदनाद्वारे शासनास विचारणा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील शासकीय वैद्यकीय, आयुर्वेद, दंत चिकित्सा महाविद्यालयात मे, २०२३ अखेर अधिष्ठाता, शिक्षक, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांची एकूण मंजूर पदे किती आहेत व त्यापैकी किती पदे रिक्त आहेत, ती भरण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात प्राध्यापक व सहायक प्राध्यापकांची पदे रिक्त असल्याची बाब माहे मार्च, २०२३ मध्ये निदर्शनास आली असून नागपूरसह राज्यातील प्राध्यापकांच्या २१६ तर सहायक प्राध्यापकांच्या ३०६ पदांच्या भरती प्रक्रियेस विलंब होत होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातील सरळसेवेने भरावयाच्या अध्यापक संवर्गातील पदांचे आरक्षण निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे काय, तसेच सदर पदे नियमितरित्या भरेपर्यंत विद्यार्थी व रुग्ण हित विचारात घेऊन कंत्राटी तत्वावर भरण्यात आली आहेत काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोरोनासदृश अन्य गंभीर परिस्थितीत आरोग्य सेवेचे बळकटीकरण व्हावे या उद्देशाने उक्त पदभरती व कंत्राटी कर्मचाऱ्यांना तात्काळ कायम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे अंशत: खरे आहे.

काही प्रमाणात पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३)(अ) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय / दंत महाविद्यालय व रुग्णालयांतील गट-अ ते गट-ड संवर्गाची मे, २०२३ अखेरची पदस्थिती –

| **अ.क्र.** | **पदनाम** | **मंजूर** | **भरलेली** | रिक्त |
|---|---|---|---|---|
| १ | अधिष्ठाता | २६ | १८ | ८ |
| २ | प्राध्यापक | ६२१ | ३७६ | २४५ |
| ३ | सहयोगी प्राध्यापक | १२६७ | ८६७ | ४०० |
| ४ | सहायक प्राध्यापक | २०५८ | १०५० | १००८ |
| ५ | गट-क | २११०७ | १३३५१ | ७७५६ |
| ६ | गट-ड | ९५४३ | ५५६९ | ३९७४ |

(ब) आयुष संचालनालयांतर्गत शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातील गट-अ ते गट-ड संवर्गाची पदस्थिती

| **अ.क्र.** | **पदनाम** | **मंजूर** | **भरलेली** | रिक्त |
|---|---|---|---|---|
| १ | अधिष्ठाता | ६ | ४ | २ |
| २ | प्राध्यापक | ७३ | ४७ | २६ |
| ३ | सहयोगी प्राध्यापक | १०२ | ५८ | ४४ |
| ४ | सहायक प्राध्यापक | १५० | ६४ | ८६ |
| ५ | गट-क | ९११ | ४०१ | ५१० |
| ६ | गट-ड | ६४१ | ४३३ | २०८ |

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील गट-अ व गट-ब मधील रिक्त पदे सरळसेवेने व पदोन्नतीने भरण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे. त्यानुसार सरळसेवेने प्राध्यापक संवर्गातील ९१ व सहायक प्राध्यापक सवंर्गातील ५२५ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली आहे. तसेच प्राध्यापक संवर्गातील ११७ अध्यापकांना पदोन्नतीने नियुक्ती देण्यात आलेली असून उर्वरित रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. गट-क संवर्गातील ५१८० पदे भरण्याकरीता टी.सी.एस.आय.ओ.एन. या कंपनीमार्फत स्पर्धा परीक्षा घेण्यात आली आहे. गट-ड संवर्गातील पदे ही जिल्हास्तरीय समितीमार्फत भरण्यात येणार आहे. त्यानुषंगाने संबंधित संस्थेचे अधिष्ठाता व संबंधित जिल्हाधिकारी यांना सुचना देण्यात आल्या आहेत.
(४) हे खरे नाही.

प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू असून यासंदर्भात प्रश्न भाग क्र. (३) च्या उत्तरामध्ये माहिती दिली आहे.

(५) शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातील सरळसेवेने भरावयाच्या अध्यापक संवर्गातील ११४ रिक्त पदांचे आरक्षण सामान्य प्रशासन विभागाकडून निश्चित करण्यात येवून मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे. सदर पदे नियमितरित्या भरेपर्यंत संबंधित अधिष्ठाता यांच्या स्तरावर कंत्राटी तत्वावर पद भरण्यात येत आहे.

(६) या विभागाच्या अखत्यरितीतील रिक्त पदे भरण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच तात्पुरत्या स्वरुपात काम करणाऱ्यांना कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यास सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २५/०८/२००५ च्या शासन परिपत्रकान्वये निर्बंध घालण्यात आले आहेत.

-----------------

## ओसरवीरा (ता.डहाणू, जि.पालघर) गावातील गर्भवतीचा बाळासह वैद्यकीय उपचाराअभावी मृत्यू झाल्याबाबत

**(८) * १८९२४ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील कासा उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांनी वेळेवर वैद्यकीय उपचार उपलब्ध करून न दिल्याने ओसरवीरा (ता.डहाणू) गावातील आठ महिन्यांच्या गर्भवतीचा बाळासह दुर्दैवी मृत्यू झाला असल्याची घटना दिनांक १५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने डहाणू तालुक्यातील ओसरवीरा येथील आठ महिन्यांची गर्भवती आणि तिच्या बाळाच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या कासा उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

श्रीमती सोनाली राजू वाघात, वय २१ वर्षे, ओसरवीरा (ता.डहाणू) ही गर्भवती माता दिनांक १२/०५/२०२३ रोजी सायंकाळी ६.३० वाजता उपजिल्हा रुग्णालय, कासा येथे दाखल झाली. सदर मातेच्या तपासण्या, तसेच तिच्यावर उपचार व औषधोपचार करून पुढील विशेष उपचाराकरीता वेदांता रुग्णालय, धुंदलवाडी येथे संदर्भित करण्यात आले होते. परंतु सदर मातेला वेदांता रुग्णालय, धुंदलवाडी येथे रुग्णालयात पोहचल्यानंतर तेथील डॉक्टरांनी मृत घोषित केले.

(२) होय.

सदर प्रकरणी राज्यस्तरीय चौकशी समितीने चौकशी केली आहे. तसेच जिल्हास्तरीय समितीने दिनांक १३/०५/२०२३ रोजी भेट देऊन सदर माता मृत्यूची चौकशी केली असून दिनांक १२/०५/२०२३ रोजी सायंकाळी कर्तव्यावर असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांनी रुग्णांच्या तपासणी व उपचारांबाबत रुग्णसेवा नियमांचा व मार्गदर्शक सूचनांचा अवलंब न केल्याने कर्तव्यात कसूर केल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर प्रकरणी जबाबदार असलेले डॉ. विशाल सिंग, कंत्राटी वैदयकीय अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय, कासा यांच्या सेवा दिनांक ०५/०७/२०२३ च्या आदेशानुसार समाप्त करण्यात आलेल्या आहेत. तसेच जबाबदार अधिपरिचारीका, उपजिल्हा रुग्णालय, कासा यांची ग्रामीण रुग्णालय, विक्रमगड येथे बदली करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सरपंच व उप सरपंच यांना शासनाकडून १००% मानधन मिळणेबाबत

**(९) * १९८०९ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंचांच्या व उपसरपंचांच्या मानधनात माहे जुलै, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान वाढ करण्यात आली असून, लोकसंख्येच्या निकषानुसार सरपंचांना मानधन देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरपंचांना व उपसरपंचाना मिळणाऱ्या मानधनांची रक्कम ७५% शासनाकडून व २५% ग्रामपंचायतींच्या स्वनिधीतून मिळते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील अनेक छोटया ग्रामपंचायतींचे उत्पन्न अल्प असल्याने अनेक सरपंच ग्रामपंचायतींच्या स्वनिधीतुन मिळणाऱ्या मानधनापासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने ग्रामपंचायतींची आर्थिक स्थिती पाहता शासनाकडून सरपंच व उपसरपंच यांना १०० % मानधन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
शासन निर्णय २१/०१/२००० अन्वये ग्रामपंचायतीच्या सरपंचांना मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लोकप्रतिनिधींची मागणी आणि महागाई वाढ आणि सरंपचांच्या कर्तव्यातील वाढ लक्षात घेऊन दिनांक ३० जुलै, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील सरपंचांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला असून उपसरंपचाना देखील मानधन अनुज्ञेय करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार ग्रामपंचायतींच्या लोकसंख्यानिहाय वर्गवारीनुसार सर्व ग्रामपंचायतीच्या सरपंचाना व उप सरपंचाना मानधन देण्यात येत आहे. सदर मानधनासाठी ७५% अनुदान शासनाकडून देण्यात येत असून उर्वरित २५% मानधनाची रक्कम संबंधित ग्रामपंचायतीच्या स्वनिधीमधून अदा करण्यात येते.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रात सेवारत असणाऱ्या कंत्राटी परिचारिका, अधिपरिचारिका व स्त्री परिचर यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(१०) * १९४९३ श्रीमती उमा खापरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे, श्री.प्रवीण दटके, श्री.एकनाथराव खडसे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रात सन १९६६ पासून सेवारत असलेल्या १,६७३ महिला परिचरांना किमान वेतन १८ हजार रुपये मिळावे, नियमित सेवेत घ्यावे, अंशकालीन नावात बदल करून पूर्णकालीन करावे, प्रतिवर्षी २ हजार रुपये भाऊबीज मिळावी, दैनंदिन १०० रुपये मिळणारी रक्कम ७०० रुपये करून मिळावी, शासकीय गणवेश, ओळखपत्र आणि विमा रक्कम मिळावी यासह अनेक मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने आझाद मैदानात धरणे आंदोलन सुरू केले असल्याची बाब माहे मे, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आंदोलनकर्त्यांच्या शिष्टमंडळाला मा.मुख्यमंत्र्यांनी आगामी मंत्रिमंडळाच्या बैठकीत अंशकालिन परिचरांचे सर्व प्रश्न सोडविले जातील, असे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्याच्या आरोग्य विभागातील कोरोना आपत्तीसह विविध आपत्तीच्या काळात अविरत काम केलेल्या ५९७ कंत्राटी परिचारिका व अधीपरिचारिका यांना १७ वर्षे सेवा झाल्यानंतरही शासकीय सेवेत सामावून घेण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आदिवासी विकास विभागातील आश्रमशाळा वसतिगृहातील रोजंदारी-तासिका तत्वावरील कर्मचाऱ्यांना शासन सेवेत नियमित करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २ डिसेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास निर्गमित करण्यात आला असून, इतर राज्यांनी आरोग्य विभागाशी संबंधित कर्मचाऱ्यांना कायम केल्याच्या धर्तीवर आरोग्य सेविकांच्या रिक्त पदांवर या ५९७ कंत्राटी परिचारिका व अधिपरिचारिका यांना सामावून घेण्यात येणार आहे काय,

(५) असल्यास, जळगाव जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र येथे अंशकालीन स्त्री परिचर पूर्णवेळ कार्यरत असून त्यांना गत ८-९ महिन्यांपासून मानधन मिळाले नसल्याने याबाबत दिनांक १० मे २०२२ रोजी शासनास निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने आरोग्य सेविकांच्या रिक्त पदांवर कंत्राटी परिचारिका व अधिपरिचारिका यांना सामावून घेण्याच्या दृष्टीने तसेच सदर अंशकालीन स्त्री परिचर कर्मचाऱ्यांचे मानधन तातडीने देण्यासह इतर अनेक मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात एकूण १९०६ प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत १०७४० उपकेंद्र कार्यरत आहेत. प्रत्येक उपकेंद्राला एक अंशकालीन स्त्री परिचर हे पद मंजूर आहे. महाराष्ट्र राज्य महिला जिल्हा परिषद महिला महासंघाच्या वतीने आरोग्य उपकेंद्रातील अंशकालीन स्त्री परिचर यांच्या मागण्यांबाबत माहे मे, २०२३ या महिन्यात आझाद मैदान येथे बेमुदत तीव्र साखळी उपोषण पुकारलेले होते.

(२) हे अंशत: खरे आहे.

आंदोलनकर्त्या शिष्टमंडळासमवेत मा.मंत्री (आरोग्य) यांनी अंशकालीन स्त्री परिचरांच्या मानधनवाढीच्या मागणीबाबत विभागाकडून सकारात्मक भूमिका घेतली जाईल असे आश्वासित केले होते.

(३) हे खरे आहे.

(४)राष्ट्रीय आरोग्य अभियांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत समायोजन करण्यासाठी समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीच्या शिफारशी मान्य केल्यास न्यायालयीन प्रकरणे उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर शिफारशी स्विकारता येणार नाहीत तसेच सदर प्रस्ताव मा.मंत्रीमंडळासमोर सादर करण्याचीही आवश्यकता नाही या बाबीस मा.मुख्यमंत्री महोदय यांनी मान्यता दिलेली आहे.

(५) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषद जळगाव अंतर्गत कार्यरत अंशकालीन स्त्री परिचरांना मानधन अदा करण्यासाठी अनुदान प्राप्त नसल्याने माहे जानेवारी, २०२२ ते मे, २०२२पर्यंतचे मानधन थकीत होते. तथापि, सदर कालावधीचे मानधन माहे जून, २०२२ मध्ये अदा करण्यात आले आहे.

(६)(१) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत राज्यातील सर्व नागरिकांना आरोग्य विमा प्राप्त झाले आहे त्यामुळे अंशकालीन स्त्री परिचरांना आरोग्य विमा अनुज्ञेय ठरते.

(२)अंशकालीन स्त्री परिचर ह्या नियमित शासकीय कर्मचारी नसल्याने शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय सवलतीस त्या पात्र नाही.

(३) अंशकालीन स्त्री परिचरांच्या रुपये ६,०००/- मानधन करण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेस्तव विभागाकडून सादर करण्यात आला आहे.

----------------

## गौखेल ते अडबंगीनाथ गड (ता.आष्टी, जि.बीड) दरम्यानच्या रस्त्याचे तसेच पुलाचे बांधकाम पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून करण्याबाबत

**(११) * १८८१५ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गौखेल ते अडबंगीनाथ गड (ता.आष्टी, जि.बीड) या रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असून, सदर रस्त्यावरील कांबळी नदीवरील पुलावरून पावसाळ्यात चार फूट पाणी वाहत असल्यामुळे मुलांना दोन-तीन महिने शाळेपासून वंचित राहावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री.क्षेत्र अडबंगीनाथ गडावर जाणाऱ्या भाविक तसेच कल्याण वस्तीवरील नागरिकांना रस्त्याअभावी अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असून, वारंवार मागणी करुनही सदरील रस्त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कांबळी नदीवरील पूल हा कल्याण वस्ती, मळगंगा वस्ती, म्हस्के वस्ती, लांडगे वस्ती, वामन वस्ती इत्यादी वस्त्यांकरीता अत्यंत आवश्यक असून एखादी दुर्घटना घडू नये म्हणून गौखेल ते अडबंगीनाथ गड रस्ता व या रस्त्यावरील कांबळी नदीवरील पुलाचे काम तातडीने पंतप्रधान ग्रामसडक योजना/मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) सदर रस्ता मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या कोअर नेटवर्कमध्ये आहे. या योजनेच्या निकषानुसार, निधी, प्राथम्यक्रम व प्रचलित कार्यपध्दतीनुसार सदर रस्त्यावरील पुलाचे काम प्रधानमंत्री / मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून प्रस्तावित करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## राज्यात यकृत दान करण्यासाठी जनजागृती करण्याबाबत

**(१२) * १९१११ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत एका वर्षात केवळ ९० यकृतांचे दान झाले असून, ४१४५ रुग्ण यकृताच्या प्रतिक्षेत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने यकृत दान व मेंदू मृत झालेल्यांचे यकृत मिळण्यासाठी जनजागृती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात मागील वर्षात २८९ यकृताचे दान झाले आहे व ११२८ रुग्ण यकृत प्रत्यारोपणाच्या प्रतिक्षेत आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि, अवयवदानाबाबत जनतेमध्ये जनजागृती करण्याकरीता माहिती व जनसंपर्क कार्यालय, पुणे व रिजनल ऑर्गन अॅन्ड टिश्यु ऑर्गनायझेशन के.ई.एम. हॉस्पीटल, परेल मुंबई, राज्यातील विभागीय प्रत्यारोपण समन्वये केंद्रे मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर तसेच एनजीओ यांचेमार्फत पथ नाट्य, बॅनर्स पोस्टर्स, सिनेमागृहांमध्ये जाहिराती, रेडिओ जिंगल्स तसेच चर्चासत्रांद्वारे कार्यक्रम राबविण्यात येत असतात. अवयवदानाची टक्केवारी वाढण्यासाठी अवयवदान जनजागृतीसाठी लघुचित्रफिती दाखविणे, चर्चासत्रे, मार्गदर्शनपर शिबीरे आयोजित करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेतील कुटुंबांच्या उपचाराची मर्यादा पाच लाख रुपये करण्याच्या घोषणेची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१३) * १९४५२ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.महादेव जानकर, श्री.सत्यजीत तांबे, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत उपचाराची मर्यादा वार्षिक दीड लाखांवरुन पाच लाख रुपये करण्याची घोषणा माहे एप्रिल, २०२३ मध्ये करून दोन महिन्यांचा कालावधी होऊनही अद्यापही सदर घोषणेची अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत उपचाराची आर्थिक मर्यादा दिड लाख रुपये असतानाही गत १० वर्षांत प्रिमीयममध्ये मात्र २४० टक्क्यांनी वाढ झाली असून इन्श्युरन्स कंपन्यांच्या प्रिमीयम वाढीमुळे इन्श्युरन्स कंपन्यांना लाभ होतो परंतु आर्थिक मर्यादा तीच राहिल्यामुळे रुग्णांना मात्र हा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने विमा रकमेपैकी २५ टक्के रक्कम शासनाला परत देण्याच्या दिलेल्या निर्देशामुळे रुग्णांवर होणारा खर्च कमी होऊन रुग्णांना मिळणाऱ्या सेवेच्या दर्जावर परिणाम होत असून सद्य:स्थितीत कोणत्याही आजारावर दिड लाख रुपयांच्या मर्यादेत वैद्यकीय उपचार होणे शक्य नसल्यामुळे उर्वरित आर्थिक भार हा रुग्णाच्या कुटुंबियांना सहन करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत २.२ कोटी लाभार्थी कुटुंबांना निशुल्क वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत असून वैद्यकीय सेवा पुरविण्यास टाळाटाळ करणाऱ्या व रुग्णांची लुट करणाऱ्या ६४१ रुग्णालयांना या योजनेतुन वगळण्यात आले तर काही रुग्णालये या योजनेतून स्वत:हून बाहेर पडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास नवीन रुग्णालयांचा महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत समावेश करण्याबाबत शासनाची मार्गदर्शक तत्त्वे काय आहेत तसेच नवीन रुग्णालयांचा समावेश करण्यासंदर्भात आलेल्या प्रस्तावांवर शासन काय कार्यवाही करत आहे,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने उपचाराकरीता लागणारा वाढता खर्च पाहता आर्थिक दुर्बल घटकांतील रुग्णांच्या उपचाराकरीता महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत उपचाराच्या आर्थिक मर्यादेत वाढ करण्याच्या घोषणेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**डॉ. तानाजी सावंत :** (१) महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत उपचाराची मर्यादा पाच लाख करण्याबाबतच्या मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक २८/०६/२०२३ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. सदर निर्णयाची अंमलबजावणी शासन निर्णय निर्गमित झाल्यावर करण्यात येईल. सदर शासन निर्णय लवकरच निर्गमित करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे अंशत: खरे आहे.

(५) शासन निर्णय क्र. रास्वयो-२०१८/ प्र.क्र.७४/ आरोग्य-६ दिनांक २६/०२/२०१९ रोजी शासन निर्णयामधील तरतूदी व युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीसोबत झालेल्या सामजस्य करारातील अटी व शर्ती नुसार नवीन रुग्णालयाचे अंगीकरण करण्यात येते.

(६) युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीसोबतच्या सामजस्य करारातील अटी व शर्तीनुसार समन्वय, अंगीकरण व शिस्तपालन समितीकडून अंगीकृत रुग्णालयांची कामगीरी व तक्रारींबद्दल आढावा घेवून त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येते. सदर समितीची बैठक नियमित घेण्यात येते.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत विद्यमान स्थितीत प्रति कुटुंब प्रति वर्ष ₹१.५ लक्ष रकमेपर्यंत मिळणारे विमा संरक्षण रुपये ५ लक्ष पर्यंत वाढविण्याबाबत दिनांक २८/०६/२०२३ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे.

-----------------

## राज्यात रक्त पुरवठ्याबाबत धोरण अथवा नियमावली निश्चित करण्याबाबत

**(१४) * १९९८५ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय रक्त धोरणाच्या अंमलबजावणीचे कारण देवून सरकारी व खाजगी रक्तपेढ्यांमधून अनुक्रमे रूपये ८५०/- व रूपये १,४५०/- इतक्या दराने मिळणाऱ्या प्रति युनिट रक्ताची किंमत अनुक्रमे रूपये ११००/- व रूपये १,५५०/- प्रति युनिट इतकी वाढविण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय रूग्णालयात दाखल रूग्णांना रक्त व रक्त घटक जरी पूर्वीप्रमाणेच मोफत मिळणार असले तरी दारिद्रयरेषेखालील जे रूग्ण खाजगी रूग्णालयात शासनाच्या विविध आरोग्य विषयक योजनेंतर्गत मोफत उपचारासाठी जात असतात त्यांना वेळप्रसंगी विविध शस्त्रक्रियेकरीता लागणारे रक्त या खाजगी रूग्णालयांमधून पुरविण्यात येत नसल्याने रूग्णांच्या नातेवाईकांना ते अन्य शासकीय अथवा खाजगी रक्तपेढयांमधूनच विकत घ्यावे लागणार असल्याने गरीब रूग्णांवर याचा आर्थिक भार पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रक्ताच्या दरात करण्यात आलेली वाढ ही रद्द करून पूर्ववत दर कायम ठेवण्याबाबत सामान्य नागरिकांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू मागणीचे अनुषंगाने रक्ताचे दर रद्द अथवा कमी करण्याबाबत तसेच खाजगी रूग्णालयात उपचार घेणाऱ्या दारिद्रय रेषेखालील रूग्णांना आवश्यक असणारे रक्त पुरवठ्याबाबत काही धोरण अथवा नियमावली निश्चित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) अंशत: खरे आहे.
रक्ताचे प्रक्रिया शुल्क हे राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषद, नवी दिल्ली यांचेमार्फत निश्चित करण्यात येतात. त्या आधारे शासनाने दिनांक ०८/०२/२०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. नवीन निर्णयानुसार शासकीय रक्तकेंद्रासाठी सुधारित प्रक्रिया शुल्क रुपये ११००/- प्रती बॅग व अशासकीय रक्त केंद्रासाठी रुपये १५५०/- प्रती बॅग आहे.
(२) होय.
शासकीय रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांना मोफत रक्त पुरविण्यात येते / उपलब्ध करुन देण्यात येते.
(३) नाही.
(४) खाजगी रुग्णालयात उपचार घेणाऱ्या दारिद्रय रेषेखालील रुग्णांना आवश्यक असणारे रक्त पुरवठ्याबाबत शासनाने वेगळे असे धोरण अथवा नियमावली निश्चित केलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) उपजिल्हा रुग्णालयातील कंत्राटी डॉक्टरने रुग्णांची तपासणी न करता सिझेरियन शस्त्रक्रिया केल्याबाबत

**(१५) * १९७५५ ॲड.अनिल परब, श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर उपजिल्हा रुग्णालय (जि.ठाणे) येथील कंत्राटी डॉक्टरने पुरेशा सुविधांअभावी आवश्यकता नसताना तसेच अधीक्षकांची परवानगी न घेता आणि रुग्णांची तपासणी न करता दिनांक ७ एप्रिल, २०२३ या एकाच दिवसात ८ सिझेरियन शस्त्रक्रिया केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी राज्य महिला आयोगाने तात्काळ दखल घेऊन अहवाल मागविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर प्रकरणी दोषी असणाऱ्या संबंधित डॉक्टरांवर कारवाई होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) उपजिल्हा रुग्णालय, शहापूर येथे सिझेरियनसाठी पुरेशा सुविधा उपलब्ध आहेत. तसेच सदर ८ सिझेरियन दिनांक ०७/०४/२०२३ रोजी झालेल्या नसून दिनांक ०३/०४/२०२३ रोजी डॉ. सुहास कदम या कंत्राटी वैद्यकिय अधिकारी (ऑन कॉल बेसीस वर) यांनी ८ शस्त्रक्रिया केलेल्या आहेत. तसेच त्या शस्त्रक्रिया आवश्यकतेनुसार केलेल्या आहेत. ८ शस्त्रक्रियेंपैकी ३ शस्त्रक्रिया डॉ. कदम यांना व १ शस्त्रक्रिया डॉ. बडीये यांना करण्यासाठी अधिक्षकांनी परवानगी दिलेली होती.
(२) होय, हे खरे आहे.
याबाबत मा.राज्य महिला आयोगाने दखल घेवून दिनांक ०६/०४/२०२३ अन्वये अहवाल सादर करणेबाबत आदेश दिलेले आहेत.
(३) होय, चौकशी करण्यात आलेली आहे.
जिल्हा सामान्य रुग्णालय, ठाणे यांचेमार्फत गठीत समितीव्दारे चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार डॉ. कदम व डॉ. बडिये यांनी केलेल्या ०९ शस्त्रक्रिया सबळ कारण असल्याने केलेल्या आहेत असे अभिप्राय नोंदविले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील कंत्राटी शिक्षकीय पदधारकांचे शासकीय सेवेत समायोजन करण्याबाबत

**(१६) * १९८२५ श्री.विक्रम काळे, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शासनाने दिनांक २३ ऑगस्ट, २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार तुकड्यांचे श्रेणीवर्धन करुन ३३४ कंत्राटी शिक्षक पदधारकांची शासनाच्या नियमित सेवा भरतीच्या विहीत पध्द्तीने निवड करुन नियुक्ती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंत्राटी निदेशक हे औद्योगिक कुशल कामगार निर्मितीचे कार्य गत ११ वर्षांपासून करित असूनही त्यांना नियमित सेवेत सामावून घेण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कौशल्य विकास विभागात होणाऱ्या संभाव्य शिक्षकीय संवर्ग पदभरतीपुर्वी उक्त कंत्राटी शिक्षकीय पदधारकांचे शासकीय सेवेत समायोजन करावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य आय.टी.आय कंत्राटी निदेशक संघर्ष समिती यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कंत्राटी निदेशकांच्या मानधनात ७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने वाढ करण्याबाबत तसेच त्यांना नियमित सेवेत सामावून घेण्याबाबतच्या प्रस्तावावर शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कौशल्य विकास विभागात होणाऱ्या संभाव्य शिक्षकीय संवर्ग पदभरतीपूर्वी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कार्यरत कंत्राटी शिक्षकीय पदधारकांचे समायोजन करणे तसेच कंत्राटी निदेशकांच्या मानधनात ७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने वाढ करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील कार्यरत कंत्राटी निदेशकांच्या मानधनात रुपये १५०००/- वरुन रुपये २५०००/- वाढ करण्याबाबत शासन निर्णय दिनांक ०४ जुलै, २०२३ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. दिनांक १६ मे, २०२३ च्या मंत्रिमंडळ बैठकीत कार्यरत कंत्राटी निदेशक यांना शासन सेवेत नियमित करणेबाबत मागणीच्या अनुषंगाने मा.मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन योग्य तो निर्णय घेण्यात यावा, असा निर्णय देखील घेण्यात आलेला आहे, त्याअनुषंगाने याबाबतचा शासन निर्णय दिनांक १२ जुलै, २०२३ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माहूर (जि.नांदेड) गडावरील रेणूकामाता मंदिराच्या दर्शनासाठी स्कायवॉक लिफ्ट प्रकल्पाचे काम पूर्ण करणेबाबत

**(१७) * १९४३६ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहूर गडावरील (जि.नांदेड) रेणूकामाता मंदिराच्या दर्शनासाठी वयोवृध्द, ज्येष्ठ नागरिकांसाठी अत्यावश्यक असलेल्या स्कायवॉक लिफ्ट परियोजनेचे दिनांक १९ मे,२०२३ रोजी वा त्यासुमारास भूमिपुजन करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्पाचा एकूण किती खर्च प्रस्तावित करण्यात आला आहे, त्यानुषंगाने एकूण किती निधीची तरतूद करण्यात आली आहे तसेच आतापर्यंत किती निधीची उपलब्धता करुन देण्यात आली आहे, सदर प्रकल्प किती कालावधीत पूर्ण होणार आहे,
(३) असल्यास, सदर प्रकल्पामुळे पर्यटनाला चालना, व्यापारवाढ, आर्थिक आणि सामाजिक विकासाला गती मिळून स्थानिक लोकांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने माहूर गडावरील (जि.नांदेड) रेणूकामाता मंदिराच्या दर्शनासाठी स्कायवॉक लिफ्ट या प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) सदर कामाचे भूमिपूजन दिनांक २० मे, २०२३ रोजी करण्यात आले आहे.
(२) सदरचे कामास रुपये ५१.०३ कोटी करीता प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सद्य:स्थितीत कामावर रुपये २.९८ कोटी इतकी रक्कम खर्च करण्यात आली आहे. सदरचा प्रकल्प कार्यारंभ आदेशाच्या दिनांकापासून १८ महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदर कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक ४/०२/२०२३ रोजी देण्यात आले असून, ऑगस्ट २०२४ पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील "आपले सरकार" सेवा केंद्रातील कार्यरत संगणक परिचालकांना किमान वेतन लागू करण्याबाबत

**(१८) * १९३९० श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील "आपले सरकार" सेवा केंद्रातील संगणक परिचालकांना ग्रामपंचायत सुधारित आकृतीबंधानुसार किमान वेतन लागू करण्याबाबत दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास नागपूर येथे करण्यात आलेल्या आंदोलनात त्यांची मागणी मान्य करण्याचे आश्वासन शासनाने दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास मंत्रालय स्तरावर संघटनेसोबत बैठक आयोजित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संगणक परिचालकांना किमान वेतन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे. राज्यातील आपले सरकार सेवा केंद्रातील संगणक परिचालकांना ग्रामपंचायत सुधारित आकृतीबंधानुसार किमान वेतन लागू करण्याबाबत दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी नागपूर येथे आंदोलन करण्यात आले होते.
(२) होय, हे खरे आहे. दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी मा.मंत्री (ग्रा.वि) महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली होती.
(३) ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या लोकसंख्या वाढीस अनुसरून आकृतिबंध सुधारण्याबाबत दिनांक २/०८/२०१७ च्या परिपत्रकान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांचे अध्यक्षतेखाली यावलकर समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या अहवालामध्ये संगणक परिचालक यांना ग्रामपंचायतीचे कर्मचारी दर्जा देऊन त्यांना किमान वेतन देण्याबाबत शिफारस केलेली नाही. तथापि, सदर आकृतीबंधामध्ये लिपिक, वसूली कारकून किंवा डाटा ऑपरेटर हे पद पर्यायी म्हणून अंतर्भूत करण्यात

आलेले आहे. त्यानुसार ग्रामपंचायत कर्मचारी यांचे सुधारीत आकृतीबंधाचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करण्यात आला असता वित्त विभागाने त्यामध्ये काही त्रुटी उपस्थित केल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील मेळघाट व इतर तालुक्यातील आदिवासी भागातील बालमृत्यूचे प्रमाण रोखण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(१९) * १९९३५ श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.सचिन अहिर, श्री.जयंत पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण पोटे-पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाटात (जि.अमरावती) माहे एप्रिल, २०२२ ते जानेवारी, २०२३ या कालावधीत ० ते २९ दिवसाच्या ७७ बालकांच्या, एक महिना ते एक वर्ष वयाच्या ४२ बालकांच्या तर एक ते सहा वर्षे वयोगटातील ३८ बालकांच्या मृत्यूची नोंद झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरोग्य विभागाच्या अहवालानुसार मेळघाटात तीव्र कुपोषित (मॅम) श्रेणीतील बालकांची संख्या १४०३ तर अतिकुपोषित (सॅम) बालकांची संख्या १०१असून ग्राम बालविकास केंद्र पोषण पुनर्वसन केंद्रामध्ये अत्यंत कमी बालकांकरीता सेवा उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धारणी उपजिल्हा रुग्णालय, चिखलदरा आणि चुरणी येथील ग्रामीण रुग्णालयात आहार रोगतज्ञ, बालरोग तज्ञ व स्त्रीरोग तज्ञ इ.वैद्यकिय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे व तेरा दिवसांसाठी स्त्रीरोग तज्ञ व बालरोग तज्ञ यांची नियुक्ती कंत्राटी पध्दतीने करण्यात येत असल्यामुळे बालमृत्यूचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सादराबाडी, धुळघाट रेल्वे, बैरागड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे अनेक महिन्यांपासून रिक्त असून धारणी तालुक्यातील तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे एकाच वेळी चार अतिरिक्त कार्यभार असल्यामुळे त्यांच्यावर अतिरिक्त कामाचा ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मेळघाट भागामध्ये माहे जानेवारी, २०२२ मध्ये २ ग्रामीण रुग्णालये (धुळघाट रेल्वे व टेंभुरसोंडा), ४ प्राथमिक आरोग्य केंद्रे (टिटंबा, चाकर्दा, गौरखेडा बाजार, आवागड) व १३ उपकेंद्रे नव्याने मंजूर केली असून धारणी उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन १०० खाटांच्या रुग्णालयात करण्यास मान्यता देण्यात आलेली असून त्यादृष्टीने करण्यात आलेल्या कार्यवाहीचे स्वरुप व सद्य:स्थिती काय आहे,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कुपोषणामुळे होत असलेले बालमृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी तसेच विविध तालुक्यात असलेली वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

मेळघाट भागात वैद्यकीय अधिकारी यांनी केलेल्या तपासणी दरम्यान तीव्र कुपोषित (मॅम) श्रेणीतील बालकांची संख्या १४०३ तर अतिकुपोषित (सॅम) बालकांची संख्या १०१ असून मेळघाटात ग्राम बालविकास केंद्र, बाल उपचार केंद्र व पोषण पुनर्वसन केंद्रामध्ये १५१५ बालकांना सेवा देण्यात आल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

अमरावती जिल्ह्यातील मेळघाटात २०१८-१९ मध्ये ३०९ तर २०२२-२३ मध्ये १७५ बालमृत्यू झाले असून बालमृत्यूचे प्रमाण कमी होत आहे असे दिसून येते.

(४) हे खरे नाही.

माहे एप्रिल, २०२३ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र सादराबाडी, धुळपाट रेल्वे, बैरागड येथे वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे जिल्हाधिकारी अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीमार्फत भरण्यात आलेली आहेत.

(५) उपविभागीय अधिकारी धारणी यांचेकडून १३ उपकेंद्रांसाठी जागा अधिग्रहीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच उपजिल्हा रुग्णालय, धारणी येथे १०० खाटांचे श्रेणीवर्धन करण्याबाबत जागा अधिग्रहीत करण्यात आलेली असून बांधकामाबाबत ई-निविदा प्रक्रिया कार्यान्वित आहे.

(६) सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत बालमुत्युचे प्रमाण रोखण्यासाठी खालील उपाययोजना राबविण्यात येतात.

१) आजारी नवजात बालकांच्या उपचारासाठी विशेष कक्ष (SNCU)

२) नवजात शिशु स्थिरीकरणकक्ष (NBSU)

३) बालउपचारकेंद्र (CTC)

४) पोषण पुनर्वसन केंद्र (NRC)

५) घरच्या घरी नवजात शिशुची काळजी (HBNC)

६) घरच्या घरी लहान बाळाची काळजी (HBYC)

७) Mother Absolute Affection (MAA)

८) राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम

९) ॲनिमियामुक्त भारत

१०) जननी सुरक्षा योजना (JSY)

११) जननी शिशु कार्यक्रम (JSSK)

१२) मानव विकास कार्यक्रम

१३) प्रधान मंत्री मातृवंदना योजना(PMMVY)

१४)प्रधान मंत्री सुरक्षित मातृत्व अभियान,

१५) नवसंजिवनी योजना

तसेच महाराष्ट्र वैदयकीय व आरोग्य सेवा गट अ वैद्यकीय अधिकारी गट अ (वेतनस्तर एस-२०) ची रिक्त पदे भरण्याबाबत शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्यातील विशेषत: भिवंडी (जि.ठाणे) व पालघर जिल्ह्यातील विविध भागात बोगस डॉक्टरांचे दवाखाने सुरु असल्याबाबत

**(२०) * १९५५२ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे, श्रीमती उमा खापरे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ठाणे जिल्ह्यातील भिवंडी शहरात बोगस डॉक्टरांची संख्या वाढली असून भिवंडी शहरातील शांतीनगर (जि.ठाणे) येथे बनावट रुग्णालय चालविले जात असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून सदर प्रकरणी तीन महिलांना अटक झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात पालघर जिल्ह्यातही बोगस डॉक्टरांचा वावर मोठ्या प्रमाणात असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या डॉक्टरांना राज्यात महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची मान्यता घेतल्याशिवाय राज्यात वैद्यकीय व्यवसाय करता येत नाही, पण कुठलाही परराज्यातील डॉक्टर महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची मान्यता घेताना दिसत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास महाराष्ट्र मेडिकलची कौन्सिलची परवानगी नसतानाही शहराच्या विविध भागात ओपीडीच्या माध्यमातून बोगस डॉक्टरांचे अनेक दवाखाने सुरू असल्याच्या तक्रारी प्राप्त होवूनही प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय
(५) असल्यास, पालघर जिल्ह्यासह इतर सर्व जिल्ह्यातील डॉक्टरांच्या प्रमाणपत्राची तपासणी करण्याकरीता विशेष मोहीम शासनामार्फत राबविण्यात येणार आहे काय,
(६) असल्यास, वैद्यकीय परवाना नसतानाही रुग्णांवर उपचार करणाऱ्या भिवंडी, पालघर सह अन्य शहरी व ग्रामीण भागातील बोगस डॉक्टरांवर तसेच राज्यातील सर्व जिल्ह्यातील डॉक्टरांची एक सर्व समावेशक यादी संबंधित जिल्ह्यातील जिल्हास्तरीय समितीमार्फत तयार करुन बोगस डॉक्टरांवर व त्यांचेकडे काम करत असलेले कर्मचारी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण करीत नसल्यास संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७)नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे, या प्रकरणी पोलिसांकडून गुन्हे दाखल करण्यात आले असून गुन्ह्याचा तपास सुरू आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही,

महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ चे कलम ३३, ३६ व भारतीय दंड विधान, १९६० चे कलम ४१९ व ४२० अंतर्गत बोगस डॉक्टरांवर गुन्हे दाखल करून पोलिसांमार्फत कारवाई करण्यात येते.
(५) व (६) राज्यातील बोगस वैद्यकीय व्यवसायी शोधून काढण्यासाठी जिल्हास्तरीय समिती, तालुकास्तरीय समिती, महानगरपालिकास्तरीय समिती, नगरपालिकास्तरीय समिती शासन निर्णय दिनांक ०५/०९/१९९१ अन्वये गठीत करण्यात आल्या आहे.

तसेच, शासनपत्र दिनांक १५/१२/२०२१ अन्वये राज्यातील बोगस डॉक्टरांचा शोध घेवून त्यांच्यावर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोहने (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील बंद पडलेल्या मे. नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन लिमिटेड (एनआरसी) कंपनीतील कामगारांची थकीत देणी अदा करण्याबाबत

**(२१) * १९५२३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहने (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे असलेली मे. नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन लिमिटेड (एनआरसी) कंपनी सन २००९ पासून बंद झाली असून कंपनीने कामगारांचे हजारो कोटी रूपये थकविले असल्याने, आजतागायत कंपनीतील कामगारांना व शासनास त्यांची थकीत देणी मिळालेली नसल्याचे नुकतेच माहे मे,२०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कंपनीची जमीन अदानी समूहाने विकत घेतली असून, अदानी समूह पुर्वीची कामगारांची व शासनाची देणी देण्यास नकार देत असल्याने कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कंपनी प्रशासनाने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या मालमत्ता कराचे रुपये १३२ कोटी रुपये थकविलेले असून कंपनी लवाद व मा.सर्वोच्च न्यायालयाने देखील कंपनीच्या बाजूने निकाल दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत कामगारांची मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका प्रलंबित असताना राज्य शासन कामगारांचा विरोध डावलून अदानी समुहास पाठिंबा देत असून कामगारांची देणी व महानगरपालिकेच्या मालमत्ता कराची थकीत रक्कम वसूल करण्यास जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कामगाराची थकीत देणी व मालमत्ता कराची रक्कम वसुल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) व (२) मे.नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन लिमिटेड (एनआरसी) या कंपनीमध्ये दिनांक १५/११/२००९ पासून टाळेबंदी सुरू झाली असून सदर कंपनीस वित्त पुरवठा करणाऱ्या पंजाब नॅशनल बॅकेने त्यांची थकीत रक्कम मिळावी म्हणून मा.राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाकडे (National Company Law Tribunal) दाखल केलेल्या दाव्याच्या अनुषंगाने मा.न्यायाधिकरणाने Resolution Professional यांची नियुक्त केलेली आहे. त्यानुसार सदर प्रकरण राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांचेकडे न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत कामगारांची थकीत देणी देण्याची बाब राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांचेकडे प्रलंबित आहे.

मा.न्यायाधिकरणाने दिनांक १३/०३/२०२० रोजीच्या आदेशान्वये मे.अदानी प्रॉपर्टीज लिमिटेड यांनी दाखल केलेला Resolution Plan मंजूर केलेला आहे. सदर योजनेनुसार न्यायाधिकरणाने कामगारांची देणी देण्याकरीता रुपये ३२.१६ कोटी मंजूर केलेले आहेत. याशिवाय मे.अदानी प्रॉपर्टीज प्रा. लिमिटेड व एनआरसी मजदूर संघ यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार अतिरिक्त रुपये ६८ कोटी अटी व शर्थीसह विशेष लाभ योजना म्हणून कामगारांची देणी देण्याची तरतूद केलेली आहे. अशाप्रकारे कामगारांची कायदेशीर देणी देण्याकरीता एकूण रुपये १०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. दिनांक ३०/०६/२०२३ अखेर एकूण १०१९ कामगारांना रुपये २३,०४,७३,६६५/- इतक्या रकमेचे धनादेश देण्यात आलेले असून उर्वरीत ३३९२ कामगार/कर्मचाऱ्यांना धनादेश देण्याची कार्यवाही चालू आहे.

(३) कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांचेकडून प्राप्त माहितीनुसार कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या मालमत्ता कराच्या दाव्यापोटी महापालिकेने मा.राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण अपील अधिकारी (NCLAT) यांचेसमोर कंपनी अपील क्र.२२३/२०२१ दाखल केले होते. मात्र मा.न्यायाधिकरणाने ते रद्दबातल ठरविले आहे. त्याविरूध्द महानगरपालिका व्यवस्थापनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेले सिव्हील ॲप्लिकेशन क्र.४९५/२०२३ मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०३/०२/२०२३ रोजी फेटाळले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

(५) प्रश्न उद्भवत नाही

(६) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## सुशिक्षित बेरोजगारांना प्रतिमाह भत्ता देण्याबाबतच्या विशेष योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत

**(२२) * १९७९० श्री.सत्यजीत तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील सुशिक्षीत बेरोजगारांना प्रतिमाह रुपये ५०००/- इतका रोजगार भत्ता देण्याबाबत विशेष योजनेची सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान घोषणा करण्यात आली असून सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात गत काही महिन्यांपासून बेरोजगारी सातत्याने वाढत असून माहे मार्च, २०२३ मध्ये बेरोजगारीचा दर ५.५ टक्के असल्याची बाब दिनांक १ जून, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आली असून राज्यात शहराच्या तुलनेत ग्रामीण भागात रोजगाराच्या पुरेशा संधी मिळत नसून राज्यात १५ ते २३ वयोगटातल्या तरुणांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण सर्वाधिक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात पदवी, पदविका व समकक्ष शिक्षण पूर्ण केलेल्या तरुणांची संख्या वाढत असून त्यांच्या शैक्षणिक पात्रतेस अनुकूल रोजगार पुरेसे उपलब्ध होत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने राज्यातील शहरी आणि ग्रामीण बेरोजगारीचा आढावा घेउन देशात राज्यातील बेरोजगारांना युवक – युवतींना रोजगार मिळवून देण्यासह छत्तीसगड, राजस्थान धर्तीवर महाराष्ट्र राज्यातही बेरोजगार तरुणांना 'बेरोजगार भत्ता' देण्याची मागणी वेगवेगळ्या संघटनांनी व लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शासनाने राज्यातील बेरोजगारीचा आढावा घेऊन राज्यातील सुशिक्षित बेरोजारांना 'बेरोजगार भत्ता' देण्याबाबत सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे नाही.

सन २०२० मध्ये या प्रकारची घोषणा केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) मार्च, २०२३ मध्ये राज्यातील बेरोजगारीचा दर ५.५ टक्के असल्याचे (Centre for Monitoring Indian Economy-सीएमआयई) या संकेतस्थळावरील माहितीनुसार दिसून येते.

ग्रामीण शहरी नोकरी इच्छुक उमेदवारांची महास्वयम या शासनाच्या वेब पोर्टलवर नोंदणी केलेले व नोकरीस लागलेल्या उमेदवारांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| **वर्ष** | **नोकरी इच्छुक उमेदवार** | | **एकूण नोकरी लागलेल्या उमेदवारांची संख्या** |
|---|---|---|---|
| | ग्रामीण | शहरी | |
| २०२० | २८३०१२९ | २५३५५२५ | १९९४८६ |
| २०२१ | २९७२६१४ | २६६७३९७ | २१९१५६ |
| २०२२ | ३०९३२७१ | २७८५१४८ | २४८९५० |
| २०२३ (जून अखेर) | ३१६१४५२ | २९६४७७४ | ९७३०० |

(३) अंशत: खरे आहे.

शासनाच्या महास्वयम या वेब पोर्टलवर नोंदणीकृत असलेल्या/ नोकरीस लागलेल्या उमेदवारांची माहिती खालीलप्रमाणे:-

| शैक्षणिक पात्रता | नोंदणीकृत सुशिक्षित उमेदवार | | नोकरीस लागलेले सुशिक्षित उमेदवार | |
|---|---|---|---|---|
| | २०२२ | २०२३ (जून अखेर) | २०२२ | २०२३ (जून अखेर) |
| पदविका | २०८५७ | १२१९ | ११७५३ | ४१७ |
| पदवी | ९७५६४ | ९४७८ | ७३३९९ | ४७८६ |
| पदव्युत्तर | ११४१४ | १०२५ | ४३५७ | ५८ |

(४) राज्यातील बेरोजगार तरुणांना "बेरोजगार भत्ता" देण्याबाबत विविध संघटना व लोकप्रतिनिधी यांच्याकडून निवेदने प्राप्त झाली आहेत.
(५) रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने जिल्हा/तालुका स्तरावर रोजगार मेळावे आयोजित करुन सन २०२० ते जून, २०२३ अखेर पर्यंत ७,६४,८९२ इतक्या उमेदवारांना नोकऱ्या उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

बेरोजगारीची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी शासनाकडून विविध योजना राबवून उपाययोजना देखील आखण्यात आल्या आहेत.

बेरोजगार उमेदवारांना बेरोजगार भत्ता देण्याऐवजी कौशल्य प्रशिक्षणासह रोजगार सक्षम करुन जागतिक बाजारपेठेत रोजगार उपलब्ध होईल यादृष्टीने शासन सदैव प्रयत्नशील आहे. त्यामुळे राज्यातील बेरोजगारांना "बेरोजगारी भत्ता" देण्याबाबत कोणताही प्रस्ताव सद्य:स्थितीत शासनाच्या विचाराधीन नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील हिपॅटायटिस या आजाराचा संसर्ग नियंत्रणात आणण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(२३) * १९२०९ श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात राष्ट्रीय विषाणू हिपॅटायटिस नियंत्रण कार्यक्रमानुसार सन २०२१-२२ आणि सन २०२२-२३ या वर्षात आतापर्यंत एकूण २ हजार ६६५ हिपॅटायटिस रुग्ण निदर्शनास आले असून या आजाराचा धोका दिवसेदिवस वाढत असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी हिपॅटायटिस बी आणि सी हे दोन प्रकार रुग्णांच्या आरोग्याच्या दृष्टीने सर्वात घातक आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने आढावा घेवून सदर आजाराचा संसर्ग नियंत्रणात आणण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय.
राष्ट्रीय व्हायरल हिपॅटायटीस नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सन २०२१-२२ व २०२२-२३ या वर्षामध्ये हिपॅटायटीस B ची रुग्णसंख्या २४७० व हिपॅटायटीस C ची रुग्णसंख्या ६८९ अशी एकूण रुग्णसंख्या ३१५९ इतकी आहे.
(२) होय.
हिपॅटायटीस A,B,C,D, E हे एकूण ५ प्रकारचे विषाणू आहेत. त्यापैकी हिपॅटायटीस B व C च्या संसर्गाने रुग्णाचे यकृत बाधित होऊन Liver Cirrhosis, Hepatocellular Carcinoma होण्याचा धोका असतो.
(३) सद्य:स्थितीत राष्ट्रीय व्हायरल हिपॅटायटीस नियंत्रण कार्यक्रमांतर्गत हिपॅटायटीसचे निदान व उपचार करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक उपचार केंद्र चालू करण्यात आले आहे. तसेच राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमामध्ये हिपॅटायटीस B चा धोका टाळण्यासाठी हिपॅटायटीस B लसीचा समावेश करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्यावतीने पुरस्कार प्राप्त कामगारांना शासनाच्या सोयी-सुविधांचा लाभ मिळण्याबाबत

**(२४) * १९७२५ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या विविध महामंडळांच्यावतीने राज्यस्तरावरील पुरस्कारप्राप्त सामाजिक कार्यकर्त्यांना शासनाच्या विविध सोयी सुविधा दिल्या जातात परंतु, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त कामगारांना पुरस्काराव्यतिरिक्त शासनाकडून अन्य कोणत्याही सोई-सुविधा दिल्या जात नसल्याची बाब माहे मे,२०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त असलेल्या कामगारांवर अन्याय होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्यावतीने गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त कामगारांना पुरस्काराव्यतिरिक्त शासनाच्या विविध सोयी सवलतींचा लाभ मिळण्याबाबत कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त झालेल्या कामगारांना अन्य सोई-सुविधा देण्याची मागणी करणारे दिनांक २३/०५/२०२३ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) व (३) महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून कामगार कल्याण निधी भरणाऱ्या कामगार व कर्मचाऱ्यांना साहित्य, सामाजिक, शैक्षणिक व क्रीडा आदी क्षेत्रातील विशेष योगदानासाठी तसेच त्यांना चांगले काम करण्यासाठी प्रोत्साहीत करण्यासाठी गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार देण्यात येतो.

सन २०२० पासून सदर पुरस्काराच्या रक्कमेत रुपये १५०००/- वरुन रुपये २५०००/- इतकी भरीव वाढ करण्यात आली आहे.

गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त पुरस्कारार्थींना विशेष कार्य अधिकारी या पदावर नियुक्तीसाठी पात्र करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील वाड्यांमध्ये जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेतील कामे निकृष्ट दर्जाची झाली असल्याबाबत

**(२५) * १९७९४ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील अनेक गावातील वाड्यांमध्ये केंद्र शासनाच्या जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत नळपाणीपुरवठा कामांना प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नळ पाणीपुरवठा योजना राबविताना ग्रामपंचायत सदस्य, शेतकरी, ग्रामस्थ यांना विश्वासात न घेता कंत्राटदारांनी काम सुरू केले असून, सदर काम अंदाजपत्रकानुसार होत नसून कामांची शासकीय अधिकाऱ्यांनी पाहणी न केल्यामुळे नळपाणी योजनेची कामे निकृष्ट आणि दर्जाहीन झाली आहेत व कंत्राटदार आणि अधिकारी यांच्या संगमनमताने ही कामे सुरू असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेची कामे अपूर्णावस्थेत असून सदर कामांकडे अधिकाऱ्यांनी केलेल्या दुर्लक्षामुळे नळ पाणी योजना अद्याप कार्यान्वित झालेली नसून निकृष्ट आणि दर्जाहीन कामामुळे स्थानिक ग्रामस्थांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थ आणि सामाजिक संघटनांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने जलजीवन मिशनअंतर्गत राबविण्यात येणारी नळ पाणीपुरवठा योजनेची कामे दर्जेदार व उत्कृष्ट करुन भविष्यात पाणी टंचाई होणार नाही याची खबरदारी घेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय हे खरे आहे.

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत संगमेश्वर तालुक्यात जिल्हा परिषदेमार्फत अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या २०८ योजनांना तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यात येणारी ०१ प्रादेशिक पाणीपुरवठा योजना अशा एकूण २०९ योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

जल जीवन मिशनअंतर्गत योजनांच्या कामाबाबत काही प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्या असून, सदर तक्रारींचे निवारण करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु आहे.

जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत मंजूर योजनांच्या कामांचे कार्यारंभ आदेश दिल्यानंतर अंदाजपत्रकाचे ग्रामसभेत वाचन करण्यात येते. योजनांची कामे सुरु करतांना ग्रामपंचायत व संबंधित जमीन मालकांना विश्वासात घेऊनच कामे केली जातात. तसेच योजनांची कामे तांत्रिक अभियंता यांच्या नियंत्रणाखाली करण्यात येत असल्यामुळे योजनांची कामे चांगल्या दर्जाची चालू आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

संगमेश्वर तालुक्यातील काही योजनांच्या कामांना उशिरा कार्यारंभ आदेश दिल्यामुळे सदर कामे उशिरा सुरु करण्यात आली आहेत. त्यामुळे सदरची कामे अपूर्ण दिसत आहेत. सदर योजनांच्या उद्भवाची कामे उन्हाळयामध्ये पूर्ण करण्यात आली आहे.

यावर्षी पावसाळा लांबणीवर गेल्यामुळे काही गावांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागले. टंचाई कालावधीत या गावांना पर्यायी उपायोजना म्हणून टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे. तथापि, योजनांची कामे पूर्ण झाल्यानंतर टंचाईला सामोरे जावे लागणार नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील क्षयरोग निर्मुलन कार्यक्रमांतर्गतच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२६) * १८८७८ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्षयरोगसारख्या संसर्गजन्य आजारात जीव धोक्यात घालून कंत्राटी म्हणून गेली २५ वर्ष काम करणाऱ्या आरोग्य विभागातील सुमारे २२०० कर्मचाऱ्यांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांनी मानधन वाढ, विमा संरक्षण, वाहन भत्त्यात वाढ, नियमित रजा इत्यादी मागण्यांसाठी दिनांक १ मे, २०२३ रोजीपासून कामबंद आंदोलन पुकारले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अपुरे वेतन, विमा संरक्षण, नाममात्र वाहन भत्ता, अपुरी रजा यांसारख्या मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांनी केलेल्या आंदोलनाचा परिणाम राज्यातील राष्ट्रीय क्षयरोग निर्मुलन कार्यक्रमावर होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, अपुऱ्या सोयी-सुविधांमुळे काही कर्मचाऱ्यांचा मृत्यूही झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील क्षयरोग निर्मुलन कार्यक्रमात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना आवश्यक सोयी-सुविधा पुरविण्यासाठी कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

राज्यात राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत क्षयरोग कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय आरोग्य अभियानातील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे सुविधा देण्यात येत आहे.

१) सद्य:स्थितीत राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत २५७३ कर्मचारी कार्यरत आहेत. STS, STLS, PPM Coordinator, DPC संवर्गातील कर्मचाऱ्यांना फिरतीसाठी दुचाकी वाहन, दुरस्तीसाठी खर्च दिला जातो.

२) स्वत:चे वाहन वापरत असलेल्यांना STS, STLS, PPM Coordinator, DPC, DPS इंधनभत्ता (ग्रामीण भागात रुपये ३०००/- व शहरी भागात रुपये २०००/-) वाहन दुरुस्तीसाठी खर्च (ग्रामीण भागात रुपये ४०००/- व शहरी भागात रुपये २५००/-)

३) प्रवासभत्ता व दैनिकभत्ता

४) क्षयरोगाची लागण झाल्यास ६ महिने भरपगारी रजा

५) रुग्णालयात तसेच टिबी प्रयोगशाळांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पीपीई कीट देण्यात येते. क्षयरुग्णांच्या संपर्कात असलेल्या कर्मचाऱ्यांना मास्क वापरण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(२) होय.

(३) अंशत: खरे आहे.

सन २०१९-२० च्या वेतन सुसुत्रीकरणाची प्रक्रिया झालेली असून त्यानुसार सर्व कर्मचाऱ्यांना मानधन लागू करण्यात आलेले आहे. विमा संरक्षण, नाममात्र वाहनभत्ता, अपुरी रजा यांसारख्या मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांनी केलेल्या आंदोलनाबाबत आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे स्तरावर कार्यवाही सुरु आहे. लेखणी बंद आंदोलनामुळे क्षयरुग्णांच्या नोंदीपुरताच फरक पडला असून तो फरक निक्षय पोर्टलवर नोंद घेऊन दूर करण्यात येत आहे.

(४) हे खरे नाही.

मात्र अमरावती ग्रामीण येथील STS यांचा सन २०२१ मध्ये मृत्यू झाला आहे.

(५) माहे मे, २०२३ रोजी झालेल्या आंदोलनानंतर कर्मचाऱ्यांच्या मागण्याबाबत आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेठ आणि सुरगाणा (जि.नाशिक) ह्या डोंगराळ भागातील नागरिकांच्या पाण्याच्या समस्येचे निराकरण करण्याबाबत

**(२७) * १९८७९ श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेठ आणि सुरगाणा (जि.नाशिक) ह्या दोन्ही आदिवासी तालुक्यांतील भौगोलिक स्थितीमुळे पाण्याचा साठा करणे शक्य नसल्यामुळे अनेक किलोमीटर पायपीट करुन किंवा दऱ्याखोऱ्यांतून अत्यंत धोका पत्करुन तेथील रहिवाशांना उन्हाळयात खोल गेलेल्या विहिरी, चारी आणि झिरपे शोधून पाणी मिळवावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेठ हट्टीपाडा (ता.पेठ, जि.नाशिक) येथील नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी शासनाच्या वतीने या ठिकाणी झिरप्याच्या वर पाण्याच्या दोन टाक्या बसवण्यात येऊन त्यात टँकरद्वारे पाणी टाकण्यात येणार आहे असे जाहीर केले असूनही अद्याप टाक्या बसविण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गावात दोन-तीन दिवसातून एकदा टँकर येत असून, उक्त पाणी गावकऱ्यांना अपुरे पडते, तसेच महिलांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागते तरी स्थानिक प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांनी याप्रकरणी लक्ष घालून पाण्याच्या समस्येचे निराकरण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) उन्हाळयात सुरगाणा व पेठ तालुक्याच्या भौगोलिक परिस्थितीमुळे विहिंरीची पाण्याची आवक कमी होत असल्याने विहिरींचे पाणी खोल जात असल्याच्या कारणामुळे पाणीटंचाई भासते, ही वस्तुस्थिती आहे. परंतु, गावाच्या मागणीनुसार स्थानिक प्रशासनाकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो.

(२) मौजे हट्टीपाडा, ता.पेठ येथील नागरिकांना पाणी पुरवठ्याबाबत सद्य:स्थितीत कुठलीही पाणी टंचाई नाही. सदर झिरण्यावरुन हट्टीपाडाचे नागरिक पाणी भरत नाही. मौजे. खोकरतळे ग्रामपंचायत अंतर्गत मांडणपाडा येथील काही नागरिक झिरप्याचे पाणी भरत होते. परंतु सद्य:स्थितीतील मांडणपाडा येथे टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत असून सदर ठिकाणी जलकुंभाचे काम प्रगतीपथावर आहे.

(३)मौजे हट्टीपाडा व मौजे खोकरतळे, ता.पेठ येथे जल जीवन मिशन कार्यक्रमांअंतर्गत नळ पाणीपुरवठा योजना मंजूर आहेत तेथील उद्भव विहिरींचे काम पूर्ण करुन उर्ध्ववाहिनींचे काम प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील वसंतदादा पाटील शासकीय जिल्हा सामान्य रुग्णालय व जिल्हा परिषद रुग्णालयास औषध पुरवठा होत नसल्याबाबत

**(२८) * १८८५८ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसंतदादा पाटील शासकीय जिल्हा सामान्य रुग्णालय व जिल्हा परिषद रुग्णालयास (ता.मिरज, जि.सांगली) गत वर्षभरापासून औषधे पुरवठा न झाल्यामुळे रुग्ण व नातेवाईकांना रक्तदाबावरील गोळया, ड्रेसिंग साहित्य, पित्तनाशक व वेदनाशमक गोळया शासकीय रुग्णालयाशेजारील असलेल्या खाजगी औषधांच्या दुकानांमधून अधिक दराने विकत घ्यावे लागत असल्याचे दिनांक१८ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णालयात औषधे उपलब्ध नसल्याने तेथील डॉक्टरांकडून रुग्णांना वारंवार रुग्णालयाबाहेरून औषधांची खरेदी करण्यास सांगितले जात असल्याची बाबही निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वसंतदादा पाटील शासकीय जिल्हा सामान्य रुग्णालय, मिरज तसेच जिल्हा परिषद रुग्णालयास गत वर्षापासून सांगली जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयांना मागील वर्षभरापासून औषधाचा पुरवठा करण्यास झालेल्या दिरंगाईस जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करुन अशा प्रकारच्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यादृष्टीने शासनाने चौकशी केली आहे काय व उक्त चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्रे तसेच ग्रामपंचायतींमध्ये सौर ऊर्जा सुविधा बसविण्याबाबत

**(२९) * ११९७७ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदांनी सौर ऊर्जा ही नवी मोहिम हाती घेतली असून, जिल्ह्यातील प्रत्येक शाळा, ग्रामपंचायतीत १५ व्या वित्त आयोगातून सौर ऊर्जा सुविधा बसविण्यास सुरुवात केली असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्रे, तसेच ग्रामपंचायतीमध्येही सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्यात येणार असून, त्यासाठी निविदा प्रक्रिया राबविली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, १५ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर निधी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतींना वितरित केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील मोहिम राज्यातील किती जिल्ह्यात राबविण्यात आली आहे,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने या मोहिमेमुळे किती टक्के वीज देयकात घट आली आहे, तसेच राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

१५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून घेतली जाणारी कामे/उपक्रमांबाबत केंद्र शासनाने काही निकष व मार्गदर्शक सूचना दिल्या असून त्यामध्ये सौर पथदिवे, वैयक्तिक खांब आधारीत प्रणाली किंवा केद्रीकृत सौर पॅनेल प्रणाली या कामांचा समावेश आहे. राज्यातील काही जिल्हा परिषदांनी त्यांच्यास्तरावर १५ व्या वित्त आयोगाकडून प्राप्त झालेल्या निधीतून सौर ऊर्जा बसविण्यात येत असल्याचे शासनास कळविले आहे.
(२) होय, हे खरे आहे.

सौर ऊर्जा खरेदी प्रक्रिया राबविताना शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे व आवश्यकतेनुसार जिल्हा परिषदेकडून निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.
(३) होय, हे खरे आहे.

१५ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतींना निधी वितरीत करण्यात येतो. सदर निधीतून घेतली जाणारी कामे/उपक्रमांबाबत केंद्र शासनाने निश्चित केलेले निकष व मार्गदर्शक सूचनानुसार जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायती यांनी विहित पध्दतीचा अवलंब करुन खर्च करणे आवश्यक आहे.
(४) १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्याची विशिष्ट मोहिम राबविण्यात येत नसून जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांना प्राप्त निधीतून त्यांच्यास्तरावर काही जिल्हा परिषदांकडून सौर ऊर्जा बसविण्यात येत आहे.
(५) १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून सौर ऊर्जा प्रकल्प बसविण्याची प्रक्रिया राबविण्यात येत असून वीज देयकात घट झाल्याचा तपशिल जिल्हा परिषदांकडून प्राप्त झालेला नाही. १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्यास संबंधित जिल्हा परिषद त्यांच्या अधिकारकक्षेत निर्णय घेण्यास सक्षम आहेत. याबाबत शासनाकडून स्वतंत्रपणे आदेश दिलेले नाहीत.
(६)प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय पात्रता प्रवेश परिक्षेदरम्यान (नीट) सांगली येथील परीक्षा केंद्रावर विद्यार्थीनींशी गैरवर्तन केल्याबाबत

**(३०) * १९०३० श्री.प्रसाद लाड, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ‘नॅशनल टेस्टींग’ एजन्सीकडून (एनटीए) राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा (नीट) दिनांक ७ मे, २०२३ रोजी घेण्यात आली असून सांगली येथील एका परीक्षा केंद्रावर परिक्षेच्या वेळी केलेल्या तपासणीवेळी विद्यार्थिनींशी गैरवर्तन केल्याची बाब निदर्शनास आली असून, विद्यार्थिनीच्या पालकांकडून सदर प्रकरणी एनटीए, जिल्हाधिकारी, सांगली, राज्य महिला आयोग इत्यादीकडे तक्रारी दाखल करण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कॉपीचे प्रकार रोखण्यासाठी दक्षता घेताना विद्यार्थीनीचे खच्चीकरण होऊ नये अशा पध्दतीने तपासणी करणे आवश्यक असताना सदर विद्यार्थिनीसोबत झालेल्या अत्यंत लज्जास्पद आणि निदंनीय गैरवर्तन केल्याबाबत सखोल चौकशी करून संबंधिताविरोधात तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार नियमबाहय व निंदनीय कृती करणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.

पालक प्रतिनिधी व अन्य संघटनांकडून जिल्हाधिकारी सांगली आणि राज्य महिला आयोगाकडे तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदरची परीक्षा नॅशनल टेस्टींग एजन्सी, नवी दिल्ली (NTA) यांचेमार्फत अखिल भारतीय स्तरावरून आयोजित करण्यात येते. सदर परिक्षेबाबतची आचारसंहिता ठरविण्याची संपूर्ण कार्यवाही नॅशनल टेस्टींग एजन्सीकडून करण्यात येते. राज्य शासनाव्दारे सदर परीक्षा आयोजनाबाबत कार्यवाही करण्यात येत नसून सदर बाब नॅशनल टेस्टींग एजन्सीच्या अखत्यारीत येते.

सदर प्रकरणी राज्य महिला आयोगाव्दारे नॅशनल टेस्टींग एजन्सीकडून अहवाल मागविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील जामनेर येथे जिल्हा परिषदेच्या मालकीच्या भूखंडाचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३१) * १९२६३ श्री.एकनाथराव खडसे : तारांकित प्रश्न क्रमांक १६१६१ ला दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामनेर (जि.जळगाव) येथे जिल्हा परिषद मालकीचे भूखंडावर बांधा वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर व्यापारी संकुल बांधकामात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याबाबत श्री.विजय पाटील यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने दिनांक २३ मे २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल अप्राप्त आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जामनेर येथील जळगाव जिल्हा परिषदेच्या मालकीचे भूखंड गट क्रमांक २६३, २६४, २६५, २६६, २६७, २६९, २७०, ४१३, ४३३, ४४७, ४५१ वर 'बीओटी' अंतर्गत मराठी व उर्दू माध्यमाची शाळा, पंचायत समितीच्या कार्यालयाचे बांधकाम करणे व उर्वरित जागेवर वाणिज्य प्रयोजनासाठी (विकासकाचा मोबदला) म्हणून बांधकाम करणे प्रस्तावित होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील बीओटी तत्वावरील हा पहिलाच प्रकल्प असून, सदर प्रस्तावास शासनाने अटीशर्तींच्या अधिन राहून मान्यता दिली होती, तरी, विकासकाने मूळ शासकीय जागेवर व्यापारी संकुल उभारून बेकादेशीररित्या शाळा गावाबाहेर खाजगी जागेवर बांधली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशी समिती नेमून जवळपास एक वर्षाचा कालावधी होऊनही चौकशी समिती अहवाल प्राप्त न झाल्याने चौकशी अहवाल प्राप्त करून घेण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक १७ ऑक्टोबर, २०१२ रोजीच्या ठराव क्र.९० नुसार प्रस्तुत जागेवर शाळा बांधकाम मंजुरी देण्यात आलेली आहे.
(४) शासनास चौकशी अहवाल प्राप्त झाला असून चौकशी अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय उभारणीचा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत

**(३२) * १९०४७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यासाठी ४३० खाटांचे तसेच १०० विद्यार्थी क्षमता असणारे वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय उभारणीची तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिनांक १७/०९/२०२१ रोजी घोषणा करुन त्यासंदर्भात दिनांक २८ मार्च २०२२ रोजी वा त्यासुमारास शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परभणी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणीसाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाकडून तपासणी करण्यात येऊन त्यात इमारत, पदे व इतर भौतिक सुविधांबाबतचे कारण दाखवित वैद्यकीय महाविद्यालयाचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर वैद्यकीय महाविद्यालयासाठी जमीन घेतली तात्पुरत्या स्वरुपात ईमारतीची सोय केली तथापि, प्राध्यापकांच्या जागा न भरता इतर ठिकाणाहून उसनवारीने प्राध्यापकांच्या प्रतिनियुक्ती केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाकडून तपासणी करण्यापूर्वी जिल्हा प्रशासन, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, अधिष्ठाता व इतर संबंधित जबाबदार यंत्रणांनी पुर्व नियोजन न केल्याने दिनांक १७/०४/२०२३ रोजी वा त्यासुमारास राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाकडून करण्यात आलेल्या अंतिम तपासणीत ईमारत व मनुष्यबळाच्या गंभीर त्रुटी आढळून आल्यामुळे आयोगाने या वैद्यकीय महाविद्यालयाचा प्रस्ताव अमान्य केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी काय आढळून आले, त्यानुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा प्रस्ताव अमान्य होण्यास कारणीभूत असलेल्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली व चालू वर्षात वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येते आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्या दिनांक ०४/०७/२०२३ च्या आदेशान्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, परभणी येथे दिलेल्या प्रतिनियुक्ती रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच, शासन निर्णय दिनांक १५/०२/२०२३ अन्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, परभणीकरीता पदनिर्मितीस मंजूरी देण्यात आली असून पदभरती प्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे.
(४) हे खरे नाही.
राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगांतर्गत मेडीकल असेसमेंट ॲण्ड रेटींग बोर्ड यांच्याकडे झालेल्या द्वितीय अपिलात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय परभणी या संस्थेस शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी १०० विद्यार्थी प्रवेशित करण्यास मान्यता देण्यात आल्याचे दिनांक ०५/०७/२०२३ च्या पत्रान्वये कळविले आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, परभणी येथे प्रथम वर्षाकरीता १०० विद्यार्थी प्रवेशास दिनांक ०५/०७/२०२३ च्या शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आली आहे
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कंत्राटी आयुष वैद्यकीय अधिकारी यांना शासन सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत

**(३३) * १९२३९ श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय आयोग अभियानांतर्गत संपूर्ण राज्यात गेल्या १५ वर्षांपासून ६३८ कंत्राटी आयुष वैद्यकीय अधिकारी यांची अत्यल्प मानधनावर नियुक्ती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००७ पासून जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालय येथे आयुष कक्ष सुरु करुन २६२ आरोग्य संस्थामधून होमिओपॅथीच्या २२६, आयुर्वेदिकच्या २७० व युनानीच्या १४२ वैद्यकीय अधिकारी यांना केवळ २८ हजार प्रतिमहा इतके अत्यल्प मानधन दिले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सेवा दिलेल्या बीएएमएस अर्हताधारक कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून नियमित सेवेत गट अ पदावर विना अट व विनाशर्त समावेश करण्याबाबत शासनाकडे वारंवार मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दीर्घकाळापासून अत्यल्प मानधनावर कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या आयुष वैद्यकीय अधिकारी तसेच राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये सेवा दिलेल्या बीएएमएस अर्हताधारक कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या गट अ पदावर समावेश करुन त्यांना शासन सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत शासन कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) सन २००७-०८ पासून जिल्हा सामान्य रुग्णालय/ उपजिल्हा रुग्णालय/ स्त्री रुग्णालय/ ग्रामीण रुग्णालय येथे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत २६१ आरोग्य संस्थांमधून होमिओपॅथी-२२६, आयुर्वेदिक- २७०, व युनानी १४२ वैद्यकीय अधिकारी कार्यरत असून सद्य:स्थितीत मनुष्यबळ सुसूत्रीकरणानंतर पदवी अर्हताधारक आयुष वैद्यकीय अधिकाऱ्यांना रुपये २८,०००/- व पदव्युत्तर अर्हताधारक आयुष वैद्यकीय अधिकाऱ्यांना रुपये ३०,०००/- प्रतिमहा मानधन अदा करण्यात येते.
(३) होय, तथापि, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २५/०८/२००५ रोजीच्या परिपत्रकान्वये आयोग अपुरस्कृत किंवा चार महिन्यांच्या तत्त्वावरील तात्पुरत्या स्वरुपात/अस्थायी नियुक्त्या नियमित न करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. तसेच सदर परिपत्रकामध्ये नमूद करण्यात आले आहे की, मा.सर्वोच्च न्यायालयाने डॉ. चंचल गोयल वि. राजस्थान शासन सिव्हील अपील क्र.७७४४/१९९७ या प्रकरणी दिनांक १८/०२/२००३ रोजी पारित केलेल्या आदेशात स्पष्ट केले आहे की, मूळ नियुक्ती विहित मार्गाने केलेली असल्याशिवाय सेवा नियमित करता येणार नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: विदर्भात हिमोफिलियाग्रस्त रूग्णांच्या उपचारासाठी टर्शरी केअर युनिट स्थापन करण्याबाबत

**(३४) * १९३११ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: विदर्भात हिमोफिलियाग्रस्त रूग्णांना त्यांच्या आरोग्य समस्या, तज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीत उपचार घेणेबाबत अद्याप एकही टर्शरी केअर युनिट आरोग्य विभागाद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिमोफिलिया आजाराची गंभीरता पहाता सदर रूग्णांना टर्शरी केअर युनिटमध्ये भरती करून तज्ञ डॉक्टरांद्वारे उपचार करणे आवश्यक असताना आरोग्य विभागाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे सद्य:स्थितीत या रूग्णांवर केवळ डे -केअर युनिट स्थापन करून उपचार केले जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने हिमोफिलियाग्रस्त रूग्णांना त्वरित आणि योग्य उपचार मिळण्याच्या दृष्टीने टर्शरी केअर युनिट स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

(२) खरे आहे.

शासकीय रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांना मोफत रक्त पुरविण्यात येते / उपलब्ध करुन देण्यात येते.

(३) नाही.

खाजगी रुग्णालयात उपचार घेणाऱ्या दारिद्रय रेषेखालील रुग्णांना आवश्यक असणारे रक्त पुरवठ्याबाबत शासनाने वेगळे असे धोरण अथवा नियमावली निश्चित केलेली नाही.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## मौजे जळकेवाडी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथे अंगणवाडी शाळेच्या इमारतीचे अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(३५) * १९६८७ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जळकेवाडी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथील गट नं.३८६ व ३८७ ह्या जागांवर अंगणवाडी शाळेच्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे जळकेवाडी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथील अंगणवाडी शाळेचे बांधकाम कोणत्या योजनेंतर्गत व केव्हा मंजूर करण्यात आले आहे तसेच गट नं.३८७ या स्कूल पंच कमिटीच्या ७/१२ च्या नावे असलेल्या जागेवर अंगणवाडी शाळेच्या इमारतीचे बांधकाम करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, गट नं.३८७ या जागेवर अंगणवाडी शाळेच्या इमारतीचे अनधिकृत बांधकाम करण्यात आले असून, जि.प. शाळेची इमारत कोणत्या गट नं.मध्ये बांधण्यात आली आहे,

(४) असल्यास, या संदर्भात ग्रामपंचायत जळकेवाडी यांचेकडून गट नं.३८७ या स्कुल पंच कमिटीच्या ७/१२ च्या नावे असलेल्या जागेवर अंगणवाडी शाळेच्या इमारतीचे बांधकाम करण्यासंदर्भात ना-हरकत वा तसा ठराव मंजूर करण्यात आला आहे काय, असल्यास केव्हा मंजूर करण्यात आला आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मौजे जळकेवाडी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथील जिल्हा परिषद तसेच अंगणवाडी शाळेनी केलेल्या अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, गट नंबर ३८६ मध्ये जिल्हा परिषद शाळा जुनी इमारत व गट नंबर ३८७ मध्ये शाळेची नवीन इमारत व अंगणवाडीची इमारत बांधकाम करण्यात आले आहे.

(२) अंगणवाडीचे बांधकाम जिल्हा नियोजन समिती सन २०१५-२०१६ अंतर्गत मंजूर करण्यात आले आहे. तसेच जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीचे बांधकाम सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सन २००५-२००६ मध्ये प्राप्त निधीतून करण्यात करण्यात आले आहे. तसेच ग्रामपंचायतीच्या मालकीची इतर जागा नसल्याने व सोयीच्या ठिकाणी असल्याने गट नंबर ३८७ या स्कुल पंच कमिटीच्या ७/१२ च्या नावे असलेल्या जागेवर अंगणवाडी व शाळेच्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे.

(३) गट नंबर ३८७ मधील अंगणवाडी व शाळेच्या इमारतीचे बांधकाम अनधिकृत नाही व जिल्हा परिषद शाळेची इमारत गट नंबर ३८७ मध्ये बांधण्यात आलेली आहे.

(४) होय, सदर बाबतीत ग्रामपंचायत जळकेवाडी यांचेकडून गट नंबर ३८७ या स्कुल पंच कमिटीच्या ७/१२ नावे असलेल्या जागेवर बांधकाम करण्यासंदर्भात नाहरकत व मंजुरीचा ठराव क्रमांक १०/१ दिनांक ४/१/२०१६ अन्वये मंजूर करण्यात आलेला आहे.
(५) अतिक्रमण सिध्द होत नसल्याने अतिक्रमण काढण्याच्या कार्यवाहीचा प्रश्न उदभवत नाही. तरीही अहमदनगर जिल्हा परिषद प्रशासनाने गट नंबर ३८६ व ३८७ चे मोजणीबाबत उपअधीक्षक, भुमी अभिलेख ता.कर्जत यांचेकडे पत्रव्यवहार केलेला आहे.

-----------------

## अकोला जिल्ह्यातील ६४ गावांतील पाणी टंचाईच्या समस्येचे निराकरण करण्याबाबत

**(३६) * १९२९७ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील अकोला, बार्शीटाकळी, बाळापूर, पातुर, मूर्तिजापूर, अकोट व तेल्हारा इत्यादी तालुक्यांतील विविध भागातील गावांना ऐन उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी टंचाईच्या समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे मे, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खारपाणपट्ट्यातील गावांना पाणीपुरवठा होणाऱ्या ६४ खेडी खांबोरा प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेंतर्गत ६४ गावांना सद्य:स्थितीत १० ते १२ दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येत असल्याने पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामस्थांना पायपीट करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्ह्यातील ग्रामीण भागातील ७८ टंचाईग्रस्त गावांमध्ये पाणीटंचाई निवारण्यासाठी ८३ उपाययोजनांची कामे प्रस्तावित करण्यात आली असून सदर योजनांपैकी एकाही योजनांचे काम अद्याप पूर्ण करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने अकोला जिल्ह्यातील अनेक तालुक्यातील गावांमधील पाणीटंचाईच्या समस्यांचे कायमस्वरुपी निराकरण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) व (२) होय.

६४ खेडी खांबोरा प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेंतर्गत ६४ गावांना सद्य:स्थितीत १० ते १२ दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे हे खरे आहे.
(३) व (४) अकोला जिल्ह्यातील संभाव्य टंचाई कृती आराखड्यात एकूण ७८ गावांचा समावेश करण्यात आला असून त्याकरीता ८३ उपाययोजना योजनेचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यापैकी जिल्ह्यातील अकोला, मुर्तिजापूर, पातूर व बाळापूर या ४ तालुक्यातील १३ गावांत पाणी टंचाई निर्माण झालेल्याचे निदर्शनास आले असल्याने सदरील तालुक्यातील ६ गावांत ६ विहीर अधिग्रहण करण्यात आले आहे. तसेच ३ गावांत ३ विंधन विहीर/कुपनलीकेची कामे पूर्ण झालेली असून ४ गावांतील विंधन विहीर/कुपनलीकेची कामे प्रगतीपथावर आहेत.

याशिवाय जल जीवन मिशन अंतर्गत ६४ खेडी खांबोरा प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या कामाचे रेट्रोफीटींगचे काम प्रगतीपथावर असून जवळपास ६० टक्के काम पूर्ण झाले आहे. रेट्रोफीटींगचे काम पूर्ण झाल्यानंतर या गावांना नियमीत पाणीपुरवठा होणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथील रुग्णांना अतिवृष्टीमुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागल्याबाबत

**(३७) * १९१७१ श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे दिनांक १ मे २०२३ रोजी वा त्यासुमारास झालेल्या वादळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचा शिरकाव होऊन रुग्णालयातील रुग्ण, संबंधित वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वर्ग, रुग्णांचे नातेवाईक यांना मोठ्या प्रमाणात अनेक समस्यांचा सामना करावा लागला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती मधील ओपीडी व इतर कक्षांमध्ये पाणी शिरल्याने व विद्युत पूरवठा खंडीत झाला असून रुग्णालयातील संबंधित यंत्र सामुग्रींचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावतीसह इतर जिल्ह्यातील रुग्णालयांना अतिवृष्टीमुळे उद्भवणाऱ्या समस्यांचा सामना करण्याच्या दृष्टीने रुग्णालय प्रशासनाने सतर्क राहून सदर परिस्थितीवर नियंत्रण ठेऊन रुग्णसेवा देण्यास आडकाठी येऊ नये याकरीता कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील सेंट जॉर्ज रुग्णालयातील निवासी डॉक्टरांची रिक्त पदे भरुन रुग्णालयातील विविध विभागांची दुरुस्ती करण्याबाबत

**(३८) * २०३९१ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेंट जॉर्ज रुग्णालयातील स्त्रीरोगतज्ज्ञ विभाग, बालरोगतज्ज्ञ विभाग बंद असून शस्त्रक्रिया विभागाची दुरुस्ती सुरू असल्याने तातडीच्या व सोप्या शस्त्रक्रिया होत असून रुग्णांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे तसेच सद्य:स्थितीत कर्मचाऱ्यांसह निवासी डॉक्टरांचा तुटवडा असल्याने येथील बंद पडलेले दोन विभाग कोविड नंतर सुरू करण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोविडच्या दोन वर्षानंतर बाह्यरुग्ण विभागात ७० टक्क्यांनी रुग्ण घटल्याचे तसेच उपचारांसाठी आलेल्या रुग्णांना जे. जे. रुग्णालयात जाण्यास सुचविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदर रुग्णालयातील रिक्त असलेली निवासी डॉक्टरांची पदे भरुन रुग्णालयातील विविध विभागांची दुरुस्ती नुतनीकरण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येते आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अध्यापकांची भरती प्रक्रिया सुरु असून, रुग्णालयातील रुग्णकक्ष व विविध विभागांची नुतनीकरणाची प्रक्रिया टप्याटप्याने सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हस्तपोखरी – कर्जत (ता.अंबड, जि.जालना) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत

**(३९) * २०४३० श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान सडक योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या हस्तपोखरी – कर्जत (ता.अंबड, जि.जालना) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून ठेकेदाराने पॉलिथीनवर डांबर टाकून सदरहू रस्त्याचे बांधकाम केले असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द तक्रारी करुनही त्याकडे विभागाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुषंगाने सदरहू कामाची नुकसान भरपाई संबंधित ठेकेदाराकडून वसूल करुन तसेच संबंधित ठेकेदाराचा काळ्या यादीत समावेश करण्याबाबत तसेच याप्रकरणी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन संबंधित ठेकेदारास पाठीशी घालणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

सदर रस्त्याचे कामात डांबरीकरणाचे खाली SAMI Layer (Geosynthetics fabric) या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. सदर डांबरी थराचे काम सुरू असताना त्याखाली असलेला SAMI Layer ग्रामस्थांनी उचलला होता.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

तथापि, या संदर्भात प्रसार माध्यमात बातमी प्रसिध्द झाली होती. यानुषंगाने सदर रस्त्याच्या कामाची सखोल तपासणी राष्ट्रीय पायाभूत विकास संस्था (NRIDA), नवी दिल्ली यांनी स्थापन केलेल्या गटामार्फत करण्यात आली आहे. याप्रकरणी सदर गटाने काही त्रुटी निर्देशास आणून दिलेल्या असून या

अनुषंगाने राज्य शासनाने मुख्य अभियंता, प्रमंग्रासयो, पुणे यांना कार्यवाही करून अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे. तसेच सदर प्रकरणाचे गांभीर्य NRIDA ने सुचित केल्यानुसार कार्यकारी अभियंता, प्रमंग्रासयो, जालना यांना दिनांक १५/०६/२०२३ रोजीच्या आदेशान्वये कार्यमुक्त केले आहे.

-----------------

## प्रादेशिक पर्यटन योजनेतंर्गत स्थगिती उठविलेल्या कामांना शासनाने मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४०) * २०४७५ श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रादेशिक पर्यटन योजनेंतर्गत रायगड, रत्नागिरी, सोलापूर व कोल्हापूर जिल्ह्यातील सन २०२१-२२ व सन २०२२-२३ मध्ये शासनाने मंजूरी दिलेल्या कामांना स्थगिती देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णय दिनांक ३१ जानेवारी, २०२२, २९ मार्च, २०२२ व २८ जून, २०२२ नुसार रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील मंजूर असलेल्या परंतु या शासनाच्या परिपत्रकांद्वारे स्थगिती असलेल्या कामांची स्थगिती मा.उच्च न्यायालयाच्या निदेशानंतरही काढण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, राज्यातील इतर जिल्ह्यातील स्थगिती उठविलेल्या कामांनाही पर्यटन विभागाकडून अद्यापही निधी उपलब्ध करुन देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार स्थगिती उठविलेल्या कामांना तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) सदर कामांची स्थगिती उठवून निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## निघोजे (ता.चाकण, जि.पुणे) येथील महिंद्र लॉजिस्टिक प्रा. लि. या कंपनीतील माथाडी कामगारांच्या वेतनाच्या रकमेत अपहार झाल्याबाबत

**(४१) * २०५१५ श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निघोजे येथील महिंद्र लॉजिस्टिक प्रा. लि. या कंपनीत (ता.चाकण, जि.पुणे) मालांची लोडिंग व अनलोडिंगची कामे करणाऱ्या माथाडी कामगारांना माहे जानेवारी,२०२३ ते माहे एप्रिल, २०२३ पर्यंतचे वेतन अदा करण्यास विलंब होत असल्याची बाब माहे जून, २०२३ च्या प्रथम सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मे. महिंद्र लॉजिस्टिक यांना समूह क्र. ६७७ मधील माथाडी कामगारांची माहे एप्रिल, २०२३ पासून मजुरी व लेव्हीची रक्कम थेट माथाडी मंडळात जमा करण्याचे आदेश माथाडी मंडळाने दिनांक २८ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास देऊनही अद्याप मजुरी व लेव्ही मंडळात जमा करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन माथाडी संघटनांनी वाराई मजुरीचे बनावट पावती पुस्तक छापून अनधिकृतपणे रक्कम गोळा केल्याने स्थानिक पोलीस ठाण्यात त्यांच्याबाबत गुन्हे दाखल करण्यात आले असून माथाडी मंडळामार्फत त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई व फौजदारी कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बेकायदेशीरपणे माथाडी मंडळाच्या नावाने छपाई केलेल्या बनावट वाराई पावती पुस्तकाचे बेकादेशीरपणे वापर करून झालेल्या फसवणूक प्रकरणाच्या चौकशीचा तातडीने अहवाल मागविण्याच्या दृष्टीने तसेच माथाडी कामगार कायद्याचे उल्लंघन करून झालेल्या रक्कमेच्या अपहाराची चौकशी करुन संबंधितांवर गुन्हे दाखल व्हावे यृादृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) निघोजे येथील महिंद्र लॉजिस्टिक प्रा. लि. या कंपनीतील माथाडी कामगारांचे माहे जानेवारी २०२३ ते माहे एप्रिल २०२३ चे वेतन अदा करण्यास विलंब झाला होता.
(२) सदर प्रकरणी कामाची मजूरी, लेव्ही व वाराईची रक्कम माथाडी मंडळात भरणा करण्याबाबत सचिव, पिंपरी चिंचवड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांनी दिनांक २८/०४/२०२३ च्या पत्रान्वये संबंधित व्यवस्थापनास कळविले आहे.

माहे जानेवारी २०२३ ते माहे एप्रिल २०२३ या कालावधीपैकी माहे जानेवारी २०२३ व माहे फेब्रुवारी २०२३ चे वेतन दिनांक १०/०७/२०२३ रोजी कामगारांच्या बॅंक खात्यामध्ये अदा करण्यात आलेले आहे.
(३) व (४) फसवणूक प्रकरणी टोळी क्र.६७७ मधील एका कामगाराने सदर टोळीतील ६ कामगारांवर संपूर्ण रक्कमेचा भरणा मंडळात न करणे, आर्थिक शोषण व बनावट पावती फाडणे इत्यादी आरोपांबाबत म्हाळुंगे पोलीस स्टेशन, चाकण, ता.खेड, जि.पुणे येथे गुन्हा दाखल केला असून सदर प्रकरणी पोलीस विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.

ज्या ६ कामगारांवर गुन्हा दाखल झालेला आहे त्या ६ कामगारांना चौकशी पूर्ण होईपर्यंत सदर टोळीतुन कमी करुन प्रतिक्षा यादीवर ठेवण्याची कार्यवाही पिंपरी-चिंचवड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाद्वारे करण्यात आली आहे
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खुलताबाद शहर (जि.औरंगाबाद) येथे ट्रॉमा केअर सेंटर सुरु करण्याबाबत

**(४२) * १८८६८ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक १५३२२ ला दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुलताबाद शहर (जि.औरंगाबाद) येथे ट्रॉमा केअर सेंटर तात्काळ सुरु करण्यासाठी मा.आरोग्य मंत्री महोदय यांनी दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहात घोषणा केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खुलताबाद परिसरात धार्मिक /पर्यटन स्थळे व राष्ट्रीय महामार्ग असल्याने अपघाताचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने, दिनांक १८ सप्टेंबर, २०२२ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार विहीत केलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार ग्रामीण रुग्णालय, खुलताबाद येथे ट्रॉमा केअर युनिट स्थापन करण्याकरीता सुधारित प्रस्ताव सादर करण्याबाबत आयुक्त, आरोग्य सेवा संचालनालय यांचेकडून उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद यांना कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने तालुक्याचे ठिकाण असणाऱ्या खुलताबाद येथे अपघातग्रस्त रुग्णांना तातडीने आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी याकरीता ट्रॉमा केअर सेंटर उभारणीकरीता मंजूरी मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## डेक्कन ओडिसी पर्यटन ट्रेन पुन्हा सुरु करण्याबाबत

**(४३) * १९६५२ प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोना काळात सन २०२० पासून बंद करण्यात आलेली डेक्कन ओडिसी पर्यटन ट्रेन अद्याप सुरू न झाल्याने पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व सोयीने युक्त असलेली डेक्कन ओडिसी ट्रेन अद्याप सुरू न केल्याने राज्य शासनाचा लाखो रुपयाचा महसूल आणि हजारो बेरोजगारांचा रोजगार बुडत असतानाही प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने पर्यटकांच्या सुविधेसाठी कोविड काळात बंद असलेली डेक्कन ओडिसी पर्यटन ट्रेन तात्काळ सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

डेक्कन ओडिसी ही ट्रेन माहे ऑक्टोबर, २०१४ पासून ५ + ५ अशी एकूण १० वर्षे मे.कॉक्स ॲण्ड किंग्स लि. या कंपनीस देण्यात आली होती.

कोव्हिड-१९ मुळे डेक्कन ओडिसीच्या सहली मार्च २०२० पासून थांबल्या होत्या. डेक्कन ओडिसी ट्रेन पुन्हा सुरु करण्याकरीता निविदा प्रक्रिया राबवून न्यूनतम निविदाकार मे. इबिक्स ट्रॅव्हल्स यांची निवड करण्यात आली असून त्यांचेसमवेत करार करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर डेक्कन ओडिसी ट्रेन कार्यान्वित करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात शासकीय रुग्णालयातील औषध खरेदीसाठी स्वतंत्र प्राधिकरणाची स्थापना करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी न झाल्याबाबत

**(४४) * १९०८० श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या अखत्यारितील आरोग्य संस्थांसाठी आणि इतर वैद्यकीय वस्तुंची अपेक्षित गुणवत्तेसह योग्य व एकाच दराने खरेदी व पुरवठा व्यवस्था सुरळीत बळकट व गतिमान आणि अधिक पारदर्शक करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र वैद्यकीय सेवा महामंडळाऐवजी स्वतंत्र प्राधिकरण तयार करण्याचा निर्णय घेतला असून त्याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याने रुग्णालयांना मुबलक औषधांचा पुरवठा होत नसल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्यापही सदर निर्णयाची अंमलबजावणी झाली नसल्यामुळे रुग्णालयांना स्थानिक पातळीवर औषधे खरेदी करण्याच्या प्रक्रियेवर ताण येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हाफकिन बायोफार्मा या संस्थेस पूर्णवेळ संचालक नसून लेखा विभागाचे प्रमुख सध्या कार्यरत नसल्याने प्रलंबित नस्त्यांची संख्यादेखील वाढली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील वाढत्या उष्माघातामुळे वैद्यकीय तज्ञांकडून ओ.आर.एस.मिश्रित पाणी पिण्याचा सल्ला दिला जात असता शासकीय रुग्णांलयामध्ये ओआरएसचा अपुरा साठा असून राज्यातील शासकीय रुग्णालयांसाठी औषध खरेदी करणाऱ्या हाफकिन औषध निर्माण महामंडळाकडून गेल्या दोन वर्षामध्ये ओआरएस खरेदीची निविदा प्रक्रियाच राबविलेली नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासकीय रुग्णालयांना स्थानिक पातळीवर औषधे खरेदी करण्याच्या प्रक्रियेवर ताण कमी होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र वैद्यकीय सेवा महामंडळाऐवजी स्वतंत्र प्राधिकरण तातडीने स्थापन करणेबाबत तसेच ओ.आर.एस चा साठा शासकीय रुग्णालयांस तात्काळ उपलब्ध करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण अधिनियम २०२३ अंतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय वस्तु खरेदी प्राधिकरण दिनांक १०/०५/२०२३ पासून अस्तित्वात आलेले आहे.

दरम्यान हाफकिन खरेदी कक्षामार्फत होणाऱ्या पुरवठ्यास विलंब होत असल्याने जिल्हास्तरावरील जिल्हा वार्षिक योजना, जिल्हा परिषद निधी, सेस फंड, खनिकर्म निधी याद्वारे उपलब्ध संपूर्ण अनुदान स्थानिक

पातळीवर अत्यावश्यक औषधे व औषधी साहित्य खरेदीसाठी वापरण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच राज्यस्तरावर एकूण उपलब्ध अनुदानाच्या ३०% रक्कम जिल्ह्यांना वितरित करण्यात आलेली आहे. यानुसार प्रत्येक जिल्ह्याने त्यांच्याकडे असलेल्या आवश्यकतेस अनुसरून सर्व तातडीच्या औषधे व औषधी साहित्य यांची उपलब्धता करून घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हाफकीन या संस्थेच्या व्यवस्थापकीय संचालक या पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्न व औषध प्रशासनाकडे सोपविण्यात आला असून लेखा अधिकारी पदावर संचालनालय वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन या विभागातील लेखा अधिकारी यांची प्रतिनियुक्ती केली असल्याने प्रलंबित प्रकरणांचा व नस्तीचा निपटारा करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त आरोग्य संस्थांकरीता राष्ट्रीय आरोग्य अभियान निधीतून २,७८,३१,५७२ इतके ओआरएस पाकिटे व राज्य अनुदानातून ५४,००,००० इतकी पाकिटे प्रस्तावित आहेत. त्यानुसार या बाबींची निविदा अंतिम टप्यात असून, पुरवठा आदेश निर्गमित होणार आहेत. तथापि, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील रुग्णालयांमध्ये ओआरएसचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या व त्यानुसार जिल्ह्यांनी कार्यवाही केली आहे. सद्य:स्थितीत राज्यातील आरोग्य संस्थांकडे एकूण ४८,३८,६९७ इतकी ओआरएस पाकिटे उपलब्ध आहेत.

(५) महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाचे कामकाज तात्काळ सुरु करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांनी प्राधिकरणाच्या दिनांक १७/०६/२०२३ रोजीच्या पहिल्या बैठकीत निर्देश दिले असून त्यानुसार प्राधिकरणाचे कामकाज सुरु करण्यात आलेले आहे. प्रस्तुत महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणामार्फत ई-निविदा ई-देयक अदायगी, ई-औषधी संगणकीय प्रणाली, ई- पुरवठा नियंत्रण, इत्यादीद्वारे खरेदी व पुरवठा होणार असून, त्याद्वारे राज्यातील आरोग्य संस्थांना विहित कालमर्यादित औषधे व औषधी साहित्य, उपकरणे व यंत्रसामुग्री पुरवठा करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## दुर्गम आदिवासी भागातील माता व बालमृत्यू नियंत्रित करण्यासाठीच्या माहेरघर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(४५) * १८९२८ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :- (१) दुर्गम आदिवासी भागातील माता व बालमृत्यू नियंत्रित करण्यासाठी तीन दिवस आधी आरोग्यकेंद्रावर येऊन सुखरूप प्रसुती व्हावी, यासाठी सुरू करण्यात आलेल्या माहेरघर योजनेंतर्गत मातामृत्यूचे प्रमाण सर्वाधिक असलेल्या पालघर, नंदुरबार जिल्ह्यात शासनाकडून मदत प्राप्त झाली नसल्याची बाब दिनांक ३० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी झाली नसून, या योजनेचा लाभ गत पाच वर्षांत गर्भवती महिलांनी मोठ्या संख्येने घेतलेला नसून पालघरमध्ये तेरापैकी पाच केंद्रे बंद असून अमरावती येथे एकही केंद्र कार्यान्वित नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात माहेरघर बांधण्याकरीता लाखो रुपयांचा निधी खर्च करूनही माहेरघर इमारतींच्या झालेल्या दुरवस्थेमुळे राज्यातील माता सदर योजनेचा लाभ घेऊ शकत नसून माहेरघरांची अतिवृष्टीमुळे होणाऱ्या नुकसानीच्या दुरुस्तीसाठी तसेच देखभाल दुरुस्तीसाठी निधीची तरतूद उपलब्ध करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि दुर्गम आदिवासी भागातील माता व बालमृत्यू नियंत्रित करण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या माहेरघर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) सन २०२२-२४ च्या मंजूर प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यामध्ये नुतनीकरणाकरीता प्रस्तावित केलेला निधी केंद्र शासनाकडून मंजूर झालेला नाही. तथापि, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आवारात उपलब्ध असलेल्या माहेरघराची दुरूस्तीसाठी जन आरोग्य समिती अंतर्गत उपलब्ध निधीचा वापर करणेबाबत व त्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून अनुदान उपलब्ध करून घेणेबाबत जिल्ह्यांना सुचना देण्यात आल्या आहेत.
(४) राज्यात एकूण ९० माहेरघर स्थापित असून त्यापैकी २२ माहेरघरांमध्ये दुरूस्ती व नुतनीकरणाची आवश्यकता असल्याचे चौकशीअंती निष्पन्न झाले. त्यामधून ९ माहेरघरांची किरकोळ दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम सन २०२०-२१ च्या मंजूर पुरक प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यामधील अनुदानातून पूर्ण करण्यात आले आहे. तसेच ७ माहेरघरांची किरकोळ दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम सन २०२१-२२ च्या मंजूर प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यामधील अनुदानातून पूर्ण करण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने सद्य:स्थितीत २२ पैकी १६ माहेरघरांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत व उर्वरीत ६ माहेरघरांच्या दुरूस्ती व नुतनीकरण्याकरीता निधी उपलब्ध नसल्यामुळे जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून अनुदान उपलब्ध करून घेणेबाबत जिल्ह्यांना सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच जनजागृतीकरीता निधी मंजूर नसल्याने माहेरघर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संभाव्य गर्भवती लाभार्थ्यांना आशा स्वयंसेविका व वैद्यकिय अधिकाऱ्यांमार्फत समुपदेशन करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील सौर ऊर्जा प्रकल्प बंद स्थितीत असल्याबाबत

**(४६) * १९५१० श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नागपूर जिल्हा परिषदेच्या २६ प्राथमिक आरोग्य केंद्रातील सौर ऊर्जा प्रकल्प बंद स्थितीत असल्याची बाब माहे मे, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली असून सदर प्राथमिक आरोग्य केंद्रातील सौर ऊर्जा प्रकल्प बंद स्थितीत असल्याने येथील डॉक्टर, परिचारिका,कर्मचाऱ्यांना व रुग्णांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याची दखल प्रशासनाने घेतली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्ह्यातील सर्व प्राथमिकआरोग्य केंद्राचे सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशंत: खरे आहे.

नागपूर जिल्ह्यातील कार्यरत ५३ प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी सन २०१६-१७ ते २०१९-२० या कालावधीत महाऊर्जा विभागाकडून ४९ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी सोलार पॅनल बसविण्यात आले होते. सोलार पॅनल चालू /बंद स्थितीचा आढावा घेतला असता यापैकी २६ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणाचे सौर ऊर्जा पॅनल बंद असल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु विद्युत पुरवठा नियमित असल्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर, परिचारीका, कर्मच्याऱ्यांना व रुग्णांना गैरसोय निर्माण झालेली नाही.
(२) व (३) हे खरे नाही.

विभागीय व्यवस्थापक महाऊर्जा, नागपूर याच्यामार्फत सदर बंद पडलेले सौर ऊर्जा पॅनल तात्काळ दुरुस्ती करण्याकरीता जिल्हा आरोग्य अधिकारी, नागपूर या कार्यालयाकडून पाठपुरावा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाची अंमलबजावणी करणेबाबत

**(४७) * १९१६८ श्री.सुरेश धस : तारांकित प्रश्न क्रमांक १७१४१ ला दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडा वॉटर ग्रीड या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला सन २०१९ मध्ये शासनाने प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिली असून, प्रकल्पाचा प्रथम टप्पा सुरू करण्यासाठी मराठवाड्यातील काही जिल्ह्यांची निवड करण्यात आली असून, सदर योजनेमुळे दुष्काळग्रस्त आणि टंचाईग्रस्त मराठवाड्याचा पिण्याच्या पाण्याच्या समस्येचे कायमस्वरुपी निराकरण होणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार मराठवाडा वॉटर ग्रीडची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्यास मंजूरी देण्यात आली असून, पहिल्या टप्प्यात औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण व पुढील टप्प्यात औरंगाबाद जिल्ह्यातील इतर भाग, बीड, उस्मानाबाद, लातूर आणि उर्वरित पुढील टप्प्याबाबत निधी व पाण्याच्या उपलबधतेनुसार निर्णय घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाडा वॉटर ग्रीड महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात शासनाने जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत परतूर, मंठा, पैठण, गंगापूर-वैजापूर, सिल्लोड, जळकोट-उदगीर, हदगाव-हिमायतनगर व भोकर-अर्धापूर-मुदखेड या ग्रीड योजना मंजूर केल्या असून, सदर योजनेचे कार्यारंभ आदेश निर्गमित केले असून, त्यादृष्टीने करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचे स्वरुप व सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर महत्वकांक्षी प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात सुरु होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) सदर योजनांना मंजूरी देण्यात आली असून, कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत व योजनांची कामे सद्य:स्थितीत प्रगतीपथावर आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वाढते बालविवाह रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(४८) * १९११० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.सुरेश धस, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: बीड, उस्मानाबाद, लातूर या जिल्ह्यात अल्पवयीन मुलींचे विवाह मोठ्या प्रमाणात होत असून बालविवाहामुळे अल्पवयीन मुलींना अकाली मातृत्व लादल्यामुळे विविध गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात बालविवाहाचे प्रमाण ३० टक्के असल्याची बाब सर्व्हेक्षणानुसार निदर्शनास आली असून, नाशिक जिल्ह्यामध्ये १३ बालविवाह रोखण्यात यश आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आई-वडील/पालकांच्या संमतीनेच दुर्देवी बालविवाह घडून येत असून कायद्यानुसार बालविवाहास कठोर शिक्षेची तरतूद असूनही शहरातील पालकांसह ग्रामीण भागातील बहुतांश पालकवर्ग सुशिक्षित असूनही गरीबी, हलाखीची परिस्थिती यामुळे लहान वयातच राज्यात अनेक ठिकाणी बालविवाह होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात कोरोना काळामध्ये निर्माण झालेल्या समस्या, स्थलांतर अशा विविध कारणांमुळे बालविवाहांची संख्या वाढली असल्याचे माहे मार्च, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, राज्यातील विशेषत: बीड, उस्मानाबाद, लातूर या जिल्ह्यांसह इतर जिल्ह्यांतील बालविवाह समस्येचे समूळ उच्चाटन करण्याच्या दुष्टीने व राज्यात वाढलेले अवैध बालविवाह रोखून मुलींचे आयुष्य सुरक्षित करावे

याकरीता शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती आदिती तटकरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

नाशिक जिल्ह्यामध्ये माहे एप्रिल, २०२२ ते मार्च, २०२३ या कालावधीमध्ये ३८ बालविवाह रोखण्यात आले आहेत.

(३) अंशत: खरे आहे. सुशिक्षित पालकांमध्ये कायद्याबाबतची थोड्याफार प्रमाणात जागृती असल्याने बालविवाह टाळण्यात येतात.

(४) हे खरे नाही.

(५) शासनाच्या चौकशीत राज्यात सन २०२२-२३ या वर्षात ९३० बालविवाह रोखण्यात आले असून त्यापैकी ७१ प्रकरणांमध्ये FIR दाखल करण्यात आल्या आहेत.

बीड जिल्ह्यामध्ये ९८ बालविवाह रोखण्यात आले असून १ प्रकरणामध्ये FIR दाखल करण्यात आली आहे.

धाराशिव जिल्ह्यामध्ये ३७ बालविवाह रोखण्यात आले असून १ प्रकरणामध्ये FIR दाखल करण्यात आली आहे.

लातूर जिल्ह्यामध्ये ३६ बालविवाह रोखण्यात आले असून नाशिक जिल्ह्यामध्ये ३८ बालविवाह रोखण्यात आले आहेत.

१. बालविवाह रोखण्यासाठी बाल विवाह प्रतिबंध अधिनियम २००६ कार्यान्वित असून महाराष्ट्र बाल विवाह प्रतिबंध नियम २००८ निरसित करून महाराष्ट्र बाल विवाह प्रतिबंध नियम २०२२ तयार करण्यात आले आहेत.

२. बाल विवाह प्रतिबंध अधिनियम २००६ मधील कलम १६ च्या कलम (१)(२) व (३) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन (१) शासन अधिसूचना महिला व बालविकास विभाग, दिनांक १९ सप्टेंबर, २००३ अन्वये राज्यातील प्रत्येक ग्राम पंचायतीमधील ग्राम सेवकांना त्यांच्या ग्राम पंचायतीच्या क्षेत्रात बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी घोषित करण्यात आलेले आहे. (२) शासन अधिसूचना दिनांक ०३ जून, २०१३ अन्वये संबंधित ग्रामपंचायत क्षेत्रात नियुक्त केलेल्या अंगणवाडी सेविका यांना बाल विवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यांस सहाय्य करतील म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. (३) शासन अधिसूचना महिला व बालविकास विभाग, दिनांक १८/०८/२०१६ अन्वये नागरी भागासाठी बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून बालविकास प्रकल्प अधिकारी यांना व सहाय्यक बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून अंगणवाडी पर्यवेक्षिका यांना घोषित करण्यात आलेले आहे.

३. प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा बाल संरक्षण कक्षाची स्थापना करण्यात आली असून या कक्षामार्फत बाल विवाहाच्या प्रथेचे निर्मुलन करण्यासाठी जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन नियमितपणे करण्यात येते.

-----------------

## राज्यातील बांधकाम कामगारांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(४९) * १८८१० श्री.गोपिचंद पडळकर, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार राज्यातील सर्व जिल्ह्यांतील बांधकाम कामगारांना बोनस, त्यांचे सर्व प्रलंबित अर्ज निकाली काढणे, इमारत दुर्घटनेमध्ये मृत्यू झालेल्या नोंदणीकृत वा अनोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या वारसांना पाच लाख रुपये अनुदान यांसह इतर अनेक मागण्यांची पूर्तता करण्यासंदर्भात दिनांक १८ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास वांद्रे, मुंबई येथे बांधकाम कामगार संघटना, बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे सचिव तसेच इतर अधिकारी यांच्यात संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांचे स्वरूप काय आहे, सदर बैठकीच्या अनुषंगाने बांधकाम कामगारांनी उपस्थित केलेल्या मागण्यांपैकी शासनाने किती मागण्या मान्य केल्या आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने बांधकाम कामगारांच्या प्रलंबित मागण्या मान्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर बैठकीमध्ये बांधकाम कामगार संघटना संयुक्त कृती समिती यांच्यासमवेत एकूण १७ मागण्या व आयत्यावेळच्या ३ विषयाबाबत सखोल चर्चा करण्यात आली. त्यापैकी काही मागण्या शासनामार्फत मंजूर केल्या असून उर्वरित मागण्यांसदर्भात मंडळ स्तरावर आणि शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोंबिवली (जि.ठाणे) येथील केमिकल कंपनीच्या बॉयलर भट्टीमधील दुर्घटनेत जखमी झालेल्या कामगारांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(५०)** * **१९९७२ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील एमआयडीसी फेज १ मधील जय इंडस्ट्रीज या केमिकल कंपनीमधील बॉयलर भट्टीमधील उकळत असलेला वायू व कोळसा कामगारांच्या अंगावर पडून झालेल्या दुर्घटनेत सहा कामगार होरपळून जखमी झाल्याप्रकरणी कंपनी प्रशासनाविरोधात दिनांक २५ एप्रिल, २०२३ वा त्यासुमारास गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर दुर्घटनेत जखमी झालेल्या कामगारांना मदत मिळण्याच्या दृष्टीने तसेच कंपनी प्रशासनाकडून झालेल्या निष्काळजीपणामुळे आढळून आलेल्या संबंधित दोषींवर कारवाई होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) मे.जय इंडस्ट्रीयल केमिकल्स प्रा.लि. डोंबिवली या टेक्सटाईल प्रोसेसिंग कारखान्यात दिनांक २४/०४/२०२३ रोजी सकाळी ०९.३० वा. च्या सुमारास बाष्पकाच्या भट्टीच्या खिडकीतून आगीच्या ज्वाला बाहेर पडल्यामुळे सहा कामगार भाजले गेले. यापैकी, एका कामगाराचा दिनांक २५/०५/२०२३ रोजी उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.

सदर दुर्घटनेबाबत दिनांक २४/०४/२०२३ रोजी मानपाडा पोलीस स्टेशन, डोंबिवली येथे गुन्हा नोंद क्र.२७९/२०२३ दाखल करण्यात आला आहे.

(२) सदर कारखान्यातील दुर्घटनेची दिनांक २५/०४/२०२३ रोजी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीत, भट्टीमध्ये संचित झालेले व न जळालेल्या इंधनाला पुरेश्या प्रमाणात पर्जिंग केले नसल्याने, भट्टीच्या खिडकीतून आगीच्या ज्वालांचा प्रवाह उलट दिशेने झाल्याची घटना घडली.

तसेच, भट्टीच्या ज्वालांचा उलटा दिशेने होणारा प्रवाह टाळण्यासाठी, भट्टीमध्ये नकारात्मक दाब राखणे आवश्यक असते. परंतु, भट्टीमध्ये नकारात्मक दाब दर्शविणारे सूचना देण्याबाबतची व एकमेकांशी दुव्याने (Alarm & interlocking) जोडण्याची सुविधा नसल्यामुळे सदर दुर्घटना घडली असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर चौकशीमध्ये कारखाने अधिनियम, १९४८ मधील तरतुदींचा भंग आढळल्याने कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द दिनांक ०४/०७/२०२३ रोजी मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे यांचे न्यायालयात खटला क्र.१४६०५/२०२३ दाखल करण्यात आला आहे. याव्यतिरिक्त, दिनांक २४/०४/२०२३ रोजी मानपाडा पोलीस स्टेशन, डोंबिवली येथे गुन्हा नोंद क्र.२७९/२०२३ दाखल करण्यात आला आहे.

कारखाना व्यवस्थापनाने जखमी कामगारांचा वैद्यकीय उपचाराचा रुपये ५२,४१,९२९/- इतका खर्च केला आहे. तसेच, कारखाना व्यवस्थापनामार्फत मृत कामगारांच्या वारसास रुपये २,००,०००/- सानुग्रह अनुदान देण्यात आले असून, त्यांच्या वारसास नोकरी देण्याचे मान्य केले आहे. व्यवस्थापनामार्फत सदर दुर्घटनेतील पाच जखमी कामगारांना प्रत्येकी रुपये ३०,०००/- इतके सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.

सदर दुर्घटनेतील मृत / जखमी कामगार राज्य कामगार विमा योजनेंतर्गत नोंदीत असून, मृत कामगाराच्या वारसास व जखमी कामगारांना सदर योजनेंतर्गत नुकसान भरपाई देण्याबाबत प्रयत्न सुरु आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सक्षमीकरणाकरिता अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्याबाबत

**(५१) * १९४०५ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाकाळातील आरोग्यसेवेच्या सक्षमीकरणाची गरज लक्षात घेऊन सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात आरोग्य विभागाला दुप्पट निधी देण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य विभागाने अनेक आरोग्य हिताच्या योजना राबविण्याचा निर्णय घेत अर्थसंकल्पात ६३३८ कोटी ४१ लाख रुपयांची मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात आरोग्य विभागाकरीता केवळ ३५०१ कोटी रुपयांची तरतूद केल्यामुळे आरोग्य विभागाला अनेक समस्यांचा सामाना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, शासनाने आरोग्य विभागाच्या मागणीनुसार निधी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) आरोग्य विभागाकडुन राज्य सर्वसाधारण कार्यक्रमातंर्गत योजनांसाठी सन २०२३-२४ करीता रुपये ६०२२.९९ कोटी इतक्या नियतव्ययांची मागणी प्रस्तावित केली होती.
(३) सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात राज्य सर्वसाधारण कार्यक्रमातंर्गत योजनांसाठी रुपये ३५०१.०० कोटीचा नियतव्यय मंजूर केला असून, सदर नियतव्यय अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.
(४) आरोग्य विभागाकरीता आवश्यक असलेल्या वाढीव तरतुदीसाठी पावसाळी अधिवेशनात पुरक मागणीचे प्रस्ताव नियोजन व वित्त विभागास सादर करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांना नियमित शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत

**(५२) * १९३८० श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत गत १०-१५ वर्षांपासून आरोग्य सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माण अधिकारी या पदावर कार्यरत असणारे कर्मचारी हे कंत्राटी तत्वावर काम करत असून त्यांना नियमित सेवेत सामावून घेण्यासंबंधी आयटक संघटनेच्या प्रतिनिधींची मा.आरोग्य मंत्री यांचे समावेत बैठक होऊनही अद्याप कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य झाल्या नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, छत्रपती संभाजीनगर येथील मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिलेल्या निर्णयानुसार सदर कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करुन त्यांना नियमित सेवेत सामावून घेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सदोष रक्तपुरवठ्यामुळे एचआयव्ही बाधित रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्याबाबत

**(५३) * १९५५५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत पाच वर्षांत १,०१० जणांना सदोष रक्तपुरवठ्यामुळे एचआयव्ही बाधा झाल्याची तसेच अशुध्द रक्त पुरवठ्यामुळे एचआयव्हीची लागण झालेल्यांमध्ये देशात महाराष्ट्र राज्य दुसऱ्या क्रमांकावर असून रक्तातून संसर्ग झालेल्या रुग्णांच्या एकूण प्रमाणापैकी राज्यातील प्रमाण १३.२ टक्के असल्याची बाब दिनांक १० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,राज्यस्तर तसेच देशस्तरावर जनजागृती, रक्तदाताविषयी जागरुकता तसेच इतर नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करुनही राज्यात एड्सग्रस्त रुग्णांचे प्रमाण वाढत असून एचआयव्ही तपासणीसाठी जुनी एलायझा टेस्ट १०० टक्के पुरेशी नसल्याने त्याऐवजी न्यूक्लिअर ॲसिड टेस्ट चाचणी करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून भविष्यात अशुध्द रक्त पुरवठ्यामुळे एचआयव्ही बाधा होणार नाही यादृष्टीने शासनाने कोणत्या उपाययोजना हाती घेतल्या वा घेण्यात येत आहेत;
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

रक्तसंकलनानंतर एच.आय.व्ही, एच.बी.व्ही. (Hepatitis B), एच.सी.व्ही. (Hepatitis C), व्ही.डी.आर.एल. (Syphilis), मलेरिया या चाचण्या करण्यात येतात व सदर संसर्गाद्वारे बाधित (एच.आय.व्ही. सहीत) रक्त पिशव्या नष्ट (discard) करण्यात येतात. सन २०१७ ते २०२२ या दरम्यान एच.आय.व्ही. बाधित नष्ट करण्यात आलेल्या रक्त पिशव्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| सन | एकूण रक्त संकलन | एच.आय.व्ही. बाधित नष्ट केलेल्या रक्त पिशव्यांची संख्या | एच.आय.व्ही. बाधित रक्त पिशव्यांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| २०१७ | १६०२६९० | २७५५ | ०.१७ |
| २०१८ | १६५६५४२ | २६२९ | ०.१६ |
| २०१९ | १७२३३६३ | २५१४ | ०.१५ |
| २०२० | १५४६८०५ | ३१९६ | ०.२१ |
| २०२१ | १६७३९४७ | २३२८ | ०.१४ |
| २०२२ | १९२८९४७ | ४४६५ | ०.२३ |

(२) नाही.

(३) स्वैच्छिक रक्तदान हे सुरक्षित रक्तदान असते. ही बाब विचारात घेता, स्वैच्छिक रक्तदानाविषयी जागरुकता निर्माण करण्यात येते. यासाठी जागतिक रक्तदाता दिन, राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिन व वेळोवेळी समाजात स्वैच्छिक रक्तदानाचे महत्व पटवून देण्यात येते. त्यामुळे राज्याची स्वैच्छिक रक्तदानाची टक्केवारी ९९.३२ एवढी आहे.

औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याअंतर्गत नियम १९४५ नुसार रक्त संकलनानंतर एच.आय.व्ही, एच.बी.व्ही. (Hepatitis B), एच.सी.व्ही. (Hepatitis C), व्ही.डी.आर.एल. (Syphilis), मलेरिया या चाचण्या एलायझा पध्दतीने करण्याची सक्ती आहे. त्याप्रमाणे एलायझा पध्दतीने सर्व रक्तकेंद्रात संकलित होणाऱ्या रक्तपिशव्या तपासण्यात येतात. न्युक्लिअर ॲसिड टेस्ट (NAT Test) ही एक अतिरिक्त सुरक्षा चाचणी आहे. परंतु ती बंधनकारक नाही. नॅट चाचणीमुळे विंडो पिरीएड ७ दिवसापर्यंत होतो. तथापि, नॅट चाचणी देखील १००% सुरक्षित नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या कामगार कल्याण निधीमध्ये झालेल्या अपहाराची चौकशी करण्याबाबत

**(५४) * १९८८९ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने निविदा प्रक्रिया न राबविता कोट्यवधी रुपयांच्या कामगार कल्याण निधीचा अपहार केल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामगार कल्याण मंडळाच्या मुखपत्राचे मासिकात रूपांतर करून त्यामध्ये लेख लिहून घेण्यासाठीसुद्धा कोट्यवधी रुपयांचा नियमबाह्य खर्च करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माथाडी कामगार आणि सुरक्षारक्षकांच्या कल्याणाची जबाबदारी असलेल्या वेगवेगळ्या कामगार मंडळांच्या मुदत ठेवींचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले असून, तूर्तास तीन मंडळांतील १०० कोटी रुपयांच्या अपहारप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात येऊनही तपास न झाल्याने राज्य शासनाने पोलीस महासंचालकांना चौकशीचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,असंघटित कामगारांना संरक्षण मिळावे यासाठी माथाडी कायद्यातील तरतुदींनुसार विविध मंडळांकडून या कामगारांना प्रत्येक महिन्याला मजूरी दिल्यानंतर भविष्य निर्वाह निधी, उपदान आणि कल्याणकारी योजनांसाठी असलेला निधी या मंडळांकडे जमा होतो, हा निधी नियमानुसार राष्ट्रीयकृत बँकेत ठेवला जातो, रेल्वे गुडस् क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेंट लेबर मंडळ, मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ आणि धातू व कागद बाजार मंडळ या तीन मंडळांतील मुदत ठेवींतील रक्कम परस्पर काढली गेल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असूनही तपासात काहीही प्रगती झालेली नाही वा ही रक्कमही वसूल झालेली नाही, या अपहारात बँकेचे अधिकारी गुंतले असल्याचा आरोप केला जात असला तरी मंडळातील संबंधितांशी संगनमत केले आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने आढळून आलेल्या संबंधित दोषींवर कारवाई होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) अंशत: खरे आहे.

या प्रकरणी झालेल्या अपहारात जबाबदार असलेले संबंधित बँक व्यवस्थापक तसेच इतर संबंधित आरोपींना अटक झाली असून, संबंधितांविरुध्द पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदर गुन्ह्यासंदर्भात सखोल चौकशी करुन कायदेशीर कार्यवाही त्वरेने पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून पोलीस महासंचालक व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना दिनांक २१/०१/२०१९ च्या पत्रान्वये निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळाच्या ठेवींच्या झालेल्या रुपये ३६ कोटी अपहारापैंकी रुपये ११.३९ कोटी रक्कम वसूल झाली आहे.
(४) हे खरे आहे.
(५) या प्रकरणी मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळाच्या ठेवींच्या झालेल्या रुपये ३६ कोटी अपहारापैंकी रुपये ११.३९ कोटी रक्कम मंडळास प्राप्त झाली आहे.

सदर अपहार प्रकरणी पोलीस तपासात तीनही मंडळातील कोणीही संगनमत केल्याचे आढळून आलेले नाही, असे कामगार आयुक्तांनी कळविले आहे.
(६) सदर अपहार प्रकरण दि रेल्वे गुड्स क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डींग एस्टॅब्लिशमेंटस लेबर बोर्ड, मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ व धातु (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार दुकाने माथाडी कामगार मंडळ या तीन मंडळातील ठेवींच्या रक्कमेचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणी चौकशीमध्ये संबंधित बँकांचे अधिकारी समाविष्ट असल्याचे प्रथम दर्शनी आढळुन आल्याने त्यांच्याविरुध्द तसेच इतर संबंधितांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले असून, गुन्हयाचा तपास सुरु आहे. बहुतांश प्रकरणी आरोपींना अटक झाली असून ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. तसेच काही आरोपींची जामीनावर सुटका झाली आहे.

सदर गुन्ह्यासंदर्भात सखोल चौकशी करुन कायदेशीर कार्यवाही त्वरेने पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून पोलीस महासंचालक व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना दिनांक २१/०१/२०१९ च्या पत्रान्वये निर्देश देण्यात आले आहेत. मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळाच्या ठेवींच्या झालेल्या रुपये ३६ कोटी अपहारापैंकी रुपये ११.३९ कोटी रक्कम मंडळास प्राप्त झाली आहे.

सद्य:स्थितीत तीनही माथाडी मंडळातील उर्वरीत अपहार झालेली रक्कम वसुलीची कायदेशीर कार्यवाही सुरु आहे. काही आरोपींविरुध्द खटला दाखल झाला असून सदर प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.

----------------

## राज्यात शासकीय तसेच विद्यापीठ क्रीडा स्पर्धेतील जखमी खेळाडूस शासनाकडून संपूर्ण औषधोपचाराचा खर्च मिळणेबाबत

**(५५) * १९२१३ श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासकीय क्रीडा स्पर्धा तसेच विद्यापीठ क्रीडा स्पर्धा सुरु असताना एखादा खेळाडू जखमी झाल्यास त्याच्या औषधोपचाराचा संपूर्ण खर्च शासनाकडून करण्याबाबत खेळाडूंकडून संबंधित विभागाकडे वारंवार मागणी होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २१ जून, २०२२ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार, शालेय क्रीडा स्पर्धेतील जखमी खेळाडूस प्रत्यक्ष हॉस्पिटलचा खर्च किंवा जास्तीत जास्त रुपये ०१.०० लक्ष सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील विविध विद्यापीठांद्वारे क्रीडा स्पर्धेत जखमी झालेल्या खेळाडूंना औषधोपचारासाठी विमा योजना, प्रत्यक्ष औषधोपचाराचा खर्च, सदर वैद्यकीय खर्चाचा परतावा, इ. स्वरुपात मदत केली जाते, परंतु संपूर्ण खर्च शासनाकडून केला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने जखमी झालेल्या खेळाडूंच्या औषधोपचारांचे सर्व खर्च मोफत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय बनसोडे :** (१) अंशतः खरे आहे.

शासकीय स्पर्धांमध्ये भाग घेणाऱ्या खेळाडूंचा विमा राज्य सरकारने व विद्यापीठ स्पर्धांतील खेळाडूंचा विमा विद्यापीठाने उतरविणे याबाबतचे संघटनेचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) राज्यातील विविध विद्यापीठांद्वारे क्रीडा स्पर्धेत जखमी झालेल्या खेळाडूंना औषधोपचारासाठी / प्रथमोपचारासाठी विमा योजना, प्रत्यक्ष औषधोपचाराचा खर्च, वैद्यकीय खर्चाचा परतावा अशा विविध स्वरुपात मदत केली जाते. यासंदर्भातील खर्च शासनाकडून केला जात नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देवरूख (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील मध्यवर्ती ग्रामीण रूग्णालयाचे उपजिल्हा रूग्णालयात श्रेणीवर्धन करणेबाबत

**(५६) * १९३४१ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवरूख (ता.संगमेश्वर,जि.रत्नागिरी) येथे मध्यवर्ती ग्रामीण रूग्णालयाच्या नुतनीकरणाचे काम सुरू असून रूग्णालयातील अपुऱ्या सोयी-सुविधांमुळे रुग्णांना ६० ते ८० कि.मी.असणाऱ्या रुग्णालयात उपचारासाठी घेऊन जावे लागत असल्यामुळे बऱ्याचदा रूग्ण दगावत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात मुंबई-गोवा महामार्ग आणि रत्नागिरी कोल्हापूर महामार्गावरील अपघातग्रस्त रूग्णांना तसेच हदयविकाराचा झटका आलेल्या रुग्णांनाही वेळेवर उपचार न मिळाल्याने जीवितहानी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, देवरुख ग्रामीण रूग्णालयाचे उपजिल्हा रूग्णालयात श्रेणीवर्धन करण्याबाबतची मागणी संगमेश्वर तालुक्यातील विविध सामाजिक संघटना आणि लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने देवरूख ग्रामीण रुग्णालयाचे उपजिल्हा रूग्णालयात श्रेणीवर्धन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय

(२) होय

(३) होय

(४) ग्रामीण रुग्णालय, देवरुखचे ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्तालयाकडून प्राप्त होताच कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जऊळके राजगुरुनगर (खु.) (बोऱ्हाडे) (ता.खेड, जि.पुणे) येथील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(५७) * १८९०३ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जऊळके राजगुरुनगर (खु.) (बोऱ्हाडे) (ता.खेड, जि.पुणे) येथील मच्छीद्र बोऱ्हाडे ते बोरकुटे रस्ता, जुनावना रस्ता, बेदाडवस्ती रस्ता, गणपती मंदिर ते किसन बोऱ्हाडे यांच्या घरापर्यंतचा रस्ता, चिघरवस्ती रस्ता, दरा ते ठाकरवाडी रस्ता या प्रमुख रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामपंचायती क्षेत्रातील पाबळरोड पासून ते कॅनॉल पर्यंत मांडवळा वस्तीजवळ,पाबळरोड पासून ते कॅनॉल शिवरस्ता सह (मांडवळा), खरपुडी बु ते जऊळके खुर्द रस्त्यापासून चासकमान डाव्या कालव्याच्या डाव्या साईट पट्ट्यावरून, शिवरस्ता ते पाबळरोड, संदीप तनपुरे घर ते पाबळरोड, बोल्हाई वस्ती ते पवार वस्ती इत्यादी रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे गरजेचे असताना अद्यापपर्यंत झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत स्थानिकांनी संबंधित प्रशासनाकडे वारंवार रस्ते दुरुस्तीसंबंधी मागणी करुनही कोणतीच कार्यवाही होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नादुरुस्त झालेल्या रस्त्यांमुळे ग्रामस्थांची गैरसोय होत असून, संबंधित ग्रामपंचायतीकडून जिल्हा परिषद, पुणे यांनी सदर रस्त्यांच्या दुरुस्तीकरीता प्रस्ताव मागविलेला असून निधी उपलब्धता, शासन निकष यानुसार प्रस्ताव हाती घेण्याचे पुणे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१), (२), (३) व (४) होय, हे खरे आहे. सदर रस्ते अंतर्गत रस्ते असून ग्रामपंचायतीच्या अखत्यारीतील आहेत. याप्रकरणी, उपविभाग खेड, जिल्हा परिषद, पुणे यांनी सदर रस्ते दुरूस्तीसाठी विहीत नमुन्यात संबंधित ग्रामपंचायतीकडून प्रस्ताव मागविला आहे. तसेच, स्थानिक लोकप्रतिनिधींनी २५१५ १२३८ लेखाशीर्षाखाली सदर रस्ते दुरूस्तीची कामे शासनाकडे प्रस्तावित केल्यास निधी उपलब्धता व शासन निकष यानुसार निधी उपलब्ध करून देण्याबाबत पुढील कार्यवाही करणे शक्य आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विडी कामगारांच्या योजनेतील रुग्णालये पूर्ववत सुरु करण्याबाबत

**(५८) * १९९२२ श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अडीच लाख विडी कामगार असून त्यापैकी ९९% महिला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या निधीअभावी विडी कामगार कल्याण महामंडळ बंद पडल्यामुळे विडी कामगारांच्या कल्याणाच्या अनेक योजना तसेच महामंडळाच्या अखत्यारीतील दवाखाने बंद पडल्यामुळे कामगारांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आरोग्यासाठीच्या योजना राज्य कामगार विमा मंडळाकडे हस्तांतरीत करण्यात आल्या, मात्र या मंडळाला विडी उद्योगचालक त्यांचा वाटा जमा करणार की नाही याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने विडी कामगारांच्या आरोग्याच्या तसेच हिताच्या अन्य योजना पुन्हा सुरू करण्याच्या दृष्टीने निधीची तरतूद करण्याबाबत तसेच केंद्र शासनाच्या विचाराधीन असलेला कामगार कल्याण संघटनांचे (LWO) रुग्णालये / डिसपेंन्सरी, पुणे यांचे हस्तांतरण राज्य कामगार विमा महामंडळ (ESIC) योजनेतील रुग्णालयात करण्याच्या प्रस्तावाचा पाठपुरावा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) महाराष्ट्र राज्यात नोंदणी नुसार एकूण ६१,४९८ विडी कामगार नोंदीत असून त्यामध्ये महिला विडी कामगारांची संख्या जास्त आहे.
(२) हे खरे नाही.
केंद्र शासनाचा बिडी कामगार उपकर (सेस) अधिनियम, १९७६ हा कायदा दिनांक ०५/०५/२०१७ रोजी रद्द झाल्यानंतरही केंद्र शासनाच्या कामगार कल्याण संघटनेमार्फत (L.W.O.) चालवली जाणारी रुग्णालये/

दवाखाना सद्य:स्थितीत चालू असल्यामुळे राज्यातील कोणतेही विडी कामगार आणि त्यांचे कुटुंबिय वैद्यकिय सुविधांपासून वंचित राहणार नाहीत. तसेच वैद्यकीय सुविधा, कल्याणकारी योजना, पाल्यांना शिष्यवृत्ती या योजना कामगार कल्याण संघटनेमार्फत राबविण्यात येत आहेत.
(३) हे खरे नाही. आरोग्यासाठीच्या योजना सद्य:स्थितीत केंद्र शासनाच्या विडी कामगार कल्याण महामंडळामार्फत राबविल्या जात आहेत.
(४) व (५) प्रश्न उदभवत नाही.

----------------

## राज्यातील जिल्हा परिषदांमधील प्रलंबित भरती प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत

**(५९) * १९७६२ श्री.अरुण लाड, श्री.जयंत पाटील, श्री.अनिकेत तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, ॲड.अनिल परब, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागपूरसह इतर जिल्हा परिषदेमध्ये गट "क" व "ड" संवर्गातील १३ हजार ५२१ पदाच्या भरतीची प्रक्रिया गत ४ वर्षापासून प्रलंबित असून पदांच्या भरतीचे दिनांक ३ मार्च,२०१९ रोजी जाहीर केलेले वेळापत्रक राज्य शासनाने दिनांक १९ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास रद्द केले असून, या भरतीसाठी १२ लाख ७२ हजारांवर उमेदवारांनी भरलेल्या शुल्काचे सुमारे २५ कोटी रुपये राज्य शासनाकडे जमा आहेत, हे खरे आहे काय
(२) असल्यास, ग्रामविकास विभागाने राज्यातील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सदर भरती प्रक्रिया पार पाडण्यासाठी दिनांक १२ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास पत्र पाठविल्याचे तसेच सदर पदभरती प्रलंबित असतानाच जिल्हा परिषदांतील रिक्त पदांचा सुधारित आकृतिबंध तयार नसल्याची बाब दिनांक १९ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील सर्व जिल्हा परिषदेमधील पदांचा सुधारित आकृतिबंध देण्याची जबाबदारी ७ सी.ई.ओ.वर सोपविण्यात आली होती, परंतु सहा महिने उलटूनही या समितीने सुधारित आकृतिबंध शासनाकडे सादर केला नसल्याचे माहे जून,२०२३ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,राज्य शासनाने भरतीची प्रक्रिया करण्यासाठी एका खाजगी एजन्सीची नियुक्ती केली असताना, सदर खाजगी एजन्सीऐवजी ही परीक्षा टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस किंवा बँकिंग कर्मचारी निवड संस्थेमार्फत (आयबीपीएस) घेण्याचा निर्णय सामान्य प्रशासन विभागाने घेतला होता, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच जिल्हा परिषद स्तरावर आयबीपीएस संस्थेसोबत सामंजस्य करार करून अर्ज स्वीकारण्याचे संकेतस्थळ विकसित करण्याची कार्यवाही देखील सुरू करण्यात आली होती, मात्र अद्यापही यावर तोडगा निघाला नसल्याने सदर भरती प्रक्रिया प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर भरती प्रक्रियेबाबत कृती आराखडा तयार करण्याबाबत व भरती प्रक्रिया पूर्ण करुन निवड झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात येईपर्यंत "एक हेल्पलाईन" सुरु करण्याबाबत उमेदवारांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय

(७) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने तसेच सदर पदांसाठी अर्ज केलेल्या व वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांचे शुल्क त्यांना परत करण्याबाबत तसेच भरतीप्रक्रिया पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे. जिल्हा परिषदेच्या गट-क मधील १८ संवर्गाची माहे मार्च, २०१९ व ऑगस्ट, २०२१ महाभरती अंतर्गत जाहिरात, परीक्षा व संपूर्ण भरती प्रक्रिया ग्रामविकास विभागाचे शासन निर्णय दिनांक २१/१०/२०२२ नुसार रद्द करण्यात आली आहे. सदर पदभरती करीता अर्ज केलेल्या १२७२३१९ उमेदवारांची एकूण रुपये २५,००,८७,९४१/- इतकी रक्कम शासनाकडे जमा झाली आहे.

(२) व (३) होय. शासनाच्या दिनांक १२/०४/२०२३ च्या पत्रान्वये सर्व जिल्हा परिषदांनी पदभरतीबाबत संक्षिप्त टिप्पणी/ प्रेसनोट तयार करावी व पदभरतीची माहिती व शंका निरसन करणेसाठी हेल्पलाईन क्रमांक सुरू करावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

ग्रामविकास विभाग परिपत्रक दिनांक २१/१०/२०२२ अन्वये जिल्हा परिषदांतील मंजूर पदांचा सुधारित आकृतिबंध अंतिम करण्याच्या अनुषंगाने समिती गठीत करण्यात आली आहे. याबाबत कार्यवाही सुरू आहे. वित्त विभागाकडील दिनांक ३१/१०/२०२२ च्या शासन निर्णयान्वये ज्या विभागाचा सुधारीत आकृतिबंध अंतिम झालेला नाही अशा विभागातील सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदांच्या ८० टक्के मर्यादेपर्यंत रिक्त पदे भरण्यास मुभा देण्यात आलेली आहे. त्यानुसार जिल्हा परिषद अंतर्गत गट-क मधील (वाहनचालक व गट ड संवर्गातील पदे वगळून) सर्व संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांच्या ८० टक्के मर्यादेपर्यंत रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) होय.

(५) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक २१/११/२०२२ च्या अनुषंगाने जिल्हा परिषद अंतर्गत गट-क मधील (वाहनचालक व गट ड संवर्गातील पदे वगळून) सर्व संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्यासाठी सर्व जिल्हा परिषदांनी आय.बी.पी.एस. या कंपनीची निवड केली असून सामंजस्य करार अंतिम केला आहे. डेमो लिंक आय.बी.पी.एस. कंपनी मार्फत तयार करण्यात येत आहे. डेमो लिंक तपासून झाल्यानंतर त्यात आवश्यकतेप्रमाणे सुधारणा करुन सदरची लिंक अंतिम केली जाईल.

(६) व (७) होय. याबाबत शासनाच्या दिनांक १२/०४/२०२३ च्या पत्रान्वये सर्व जिल्हा परिषदांनी पदभरतीबाबत संक्षिप्त टिप्पणी/ प्रेसनोट तयार करावी व शासनस्तरावर झालेली कार्यवाही, जिल्हा परिषद स्तरावर करण्यात आलेली कार्यवाही याचा अंतर्भाव असावा, परीक्षा घेण्याबाबतचा ॲक्शन प्लॅन असावा व सदर प्रेसनोट कार्यालयाच्या दर्शनीय भागात लावावी, सर्व जिल्हा परिषदांनी पदभरतीची माहिती व शंका निरसन करणेसाठी हेल्पलाईन क्रमांक सुरू करावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

जिल्हा परिषदेच्या गट-क करीता माहे मार्च २०१९ व ऑगस्ट, २०२१ मध्ये होणारी भरती प्रक्रिया ग्रामविकास विभागाचे शासन निर्णय दिनांक २१/१०/२०२२ नुसार रद्द करण्यात आली आहे. सदर पदभरती रद्द झाल्यामुळे उक्त जाहिरातींनुसार सर्व उमेदवारांनी अर्जापोटी भरलेले परीक्षा शुल्क त्यांना संबंधित जिल्हा परिषदांमार्फत परत करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुषंगाने ग्रामविकास विभागाचे पत्र दिनांक ११/०४/२०२३ नुसार एकूण ३४ जिल्हा परिषदांना उमेदवारांनी अर्जापोटी भरलेल्या रक्कमांचा परतावा करण्याकरीता रक्कम रुपये २१,७०,६४,४१३/- जिल्हा परिषदांना वर्ग करण्यात आली आहे.

-----------------

## नवघर (ता.वसई, जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जागेत सुसज्ज रुग्णालयाचे काम सुरु करण्याबाबत

**(६०) * २०३१८ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवघर (ता.वसई, जि.पालघर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ५८ गुंठ्याच्या जागेत १०० खाटांचे सुसज्ज रुग्णालय उभारण्याच्या कामास शासनाने दिनांक ९ जून, २०१४ रोजी वा त्यासुमारास मंजूरी दिली असूनही ८ वर्षांचा कालावधी होऊनही सदर कामास अद्याप सुरुवात झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसई तालुक्यातील वाढत्या लोकसंख्येनुसार सर्वसामान्य जनतेला नवघर प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सुविधा मिळाव्यात याकरीता उभारण्यात येणाऱ्या १०० खाटांचे रुग्णालयाच्या कामास विलंब झाला असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच 'समर्थन' संस्थेने पाठपुरावा करुन मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य, संचालक, आरोग्य सेवा संचालनालय यांच्याकडे अनेकवेळा पत्रव्यवहार तसेच दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदने सादर करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवघर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जागेत १०० खाटांचे सुसज्ज असे रुग्णालयाची उभारणी करावी याकरीता पाठपुरावा करुन निर्णय घेण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय
(२) होय
(३) वसई-नवघर येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखड्याचा प्रस्ताव शासनास आयुक्तालयाकडून प्राप्त झाला होता.तथापि, सदरील अंदाजपत्रक व आराखडे हे जुन्या दरसूचीवर आधारीत असल्याने आयुक्तालयास सुधारीत दरसूचीवर अंदाजपत्रक व आराखडे सादर करण्यास कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे दर्यापूर (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथील ग्रामपंचायतीने बांधकामामध्ये केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(६१) * १९२६७ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दर्यापूर (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथील ग्रामपंचायतीने १४ व्या वित्त आयोगातून केलेल्या बांधकामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याची तक्रार श्री.प्रशांत गवळी यांनी दिनांक १९ जानेवारी,

२०२२ रोजी वा त्यासुमारास उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव यांचेकडे केली असून, सदर तक्रारीनुसार गट विकास अधिकारी यांचेकडून नेमण्यात आलेल्या चौकशी समितीच्या दिनांक ७ मार्च २०२२ रोजी प्राप्त झालेल्या अहवालामध्ये सरपंच व ग्रामसेवक दोषी असल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार संबंधित दोषी असलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) संबंधित तक्रारीच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी, पंचायत समिती भुसावळ यांनी केलेल्या चौकशी अहवालानुसार प्राथमिक चौकशीत ग्रामपंचायत दर्यापूर ता.भुसावळ येथील ग्रामसेवकाने ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय कामकाजात अनियमितता केलेली असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यानुसार संबंधित ग्रामसेवक यांना जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. तसेच संबंधित ग्रामसेवक यांचे विरूध्द १ ते ४ दोषारोप बजावण्यात आले होते व त्यांचे विरूध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली होती. तसेच दप्तर हस्तांतर न करणेबाबत १७९ प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडे सादर करण्यात आलेला आहे. तथापी सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग,नाशिक यांचेकडे त्यांची चौकशी सुरु होती. सदर चौकशीचा निकाल प्राप्त झालेला असून निकालात एकूण ०३ आरोपांपैकी ०२ आरोप सिध्द होत नाही व ०१ आरोप अंशतः सिध्द होतो असा निकाल देण्यांत आलेला आहे.सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने ग्रामसेवक यांना एक वेतनवाढ बंद करणे बाबत शिक्षा का देण्यांत येऊ नये याबाबत अंतिम कारणे दाखवा नोटीस बजाविणेत आलेली आहे. अद्याप खुलासा अप्राप्त आहे. तसेच सदर ग्रामसेवक यांचेवर दिनांक ०७/०३/२०२२ चे अहवालानुसार नवीन मुद्यांवर विभागीय चौकशी प्रस्तावीत करण्यात आलेली आहे. तक्रारदार यांचे तक्रार अर्ज व चौकशी अहवाल याचे अनुषंगाने ग्रामपंचायत दर्यापूर ता.भुसावळ येथील सरपंच यांचेवर कार्यवाही करणेपूर्वी त्यांची बाजू जाणून घेणेसाठी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव यांचेकडे सुनावणी ठेवण्यात आलेली होती. सदर सुनावणीस तक्रारदार हजर राहीले नाही. सरपंच हजर होते. त्यामुळे पुढील तारीख देण्यात आलेली आहे. सुनावणी अंती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील होमिओपॅथिक डॉक्टरांना समुदाय आरोग्य अधिकारी या पदावर काम करण्याची संधी मिळण्याबाबत

**(६२) * १९२४० श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आयुर्वेदिक, युनानी डॉक्टर तसेच बीएससी नर्सिंग उत्तीर्ण उमेदवारांची जिल्हापरिषदेंतर्गत असलेल्या प्राथमिक आरोग्य उपकेंद्रावर समुदाय आरोग्य अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, होमिओपॅथी (बीएचएमएस) डॉक्टर हे इतर वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाप्रमाणेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ यांचा साडेपाच वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करुनही समुदाय आरोग्य अधिकारी या पदासाठी होमिऑपॅथिक डॉक्टरांना अपात्र ठरविले जात असल्याने त्यांच्यावर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, युनानी, आयुर्वेदिक, बीएससी, नर्सींग यांना सहा महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात येऊन समुदाय आरोग्य अधिकारी या पदावर संधी देण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(४)असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषगाने सदर निवड प्रक्रियेत आवश्यक ते बदल करुन वरीलप्रमाणे होमिओपॅथिक डॉक्टरांनासुध्दा सहा महिन्यांचे प्रशिक्षण देऊन या पदावर संधी देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यामध्ये आरोग्यवर्धिनी कार्यक्रमांतर्गत आयुर्वेदीक, युनानी व बी. एस. सी. नर्सिंग उमेदवारांची निवड समुदाय आरोग्य अधिकारी पदावर केली जाते.
(३) हे खरे आहे.
(४) आरोग्यवर्धिनी कार्यक्रमांतर्गत आयुर्वेदीक, युनानी व नर्सिंग पदवीधारकांना समुदाय आरोग्य अधिकारी पदावर नियुक्ती देण्यात येते. सदर विषयाच्या अनुषंगाने आरोग्यवर्धिनी कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र शासनाने एक वर्षाचा Certificate Course in Modern Pharamacology पूर्ण केलेल्या होमिओपॅथीक पदवीधारकांना समुदाय आरोग्य अधिकारी पदावर समाविष्ट करुन घेणेबाबत दिनांक ०४/०७/२०१९ व दिनांक १५/०६/२०२० रोजी केंद्र शासनास विनंती करण्यात आली होती. सदर विनंतीच्या अनुषंगाने केंद्र शासनाने दिनांक १७/१२/२०१९ व दिनांक २७/११/२०२० रोजीच्या पत्राव्दारे मार्गदर्शन केले आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शनानुसार मॉडर्न फॉरमॅकोलॉजीचे प्रशिक्षण घेतलेल्या होमिओपॅथीक पदवीधारकांचा समुदाय आरोग्य अधिकारी पदभरतीमध्ये समावेश करणे शक्य नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील एकल महिलांच्या पुनर्वसनासाठी कृती आराखडा तयार करुन कार्यक्रम राबविण्याबाबत

**(६३) * १९३१८ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अहमदनगर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेद्वारा करण्यात आलेल्या सर्व्हेक्षणात १ लाख ७२६ एकल महिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकल महिलांचे असे नियोजनबध्द सर्वेक्षण करणारा अहमदनगर हा राज्यातील पहिला जिल्हा ठरला असून अशा महिलांच्या पुनर्वसन कार्यक्रमाची रुपरेषा तयार करुन कृती आराखडा जाहीर करण्याबाबत शासन स्तरावर घोषणा करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केवळ अहमदनगर जिल्ह्यात एकल महिलांची इतकी संख्या अधिक असल्याने संपूर्ण राज्यात हे सर्वेक्षण करून माहिती एकत्रित करण्याबाबतचे आवाहन साऊ एकल महिला समितीद्वारे राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाला करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अहमदनगर जिल्ह्याने केलेल्या सर्व्हेक्षणाप्रमाणे संपूर्ण राज्यात सर्वेक्षण अभियान राबवावे तसेच एकल महिलांमध्ये असलेल्या विधवा महिला, घटस्फोटीत महिला, परित्यकत्या महिला व अविवाहीत मोठ्या वयाच्या महिला यांचा समावेश दिसून येत असल्याने त्यांची माहिती एकत्रित करून त्यांना लाभ देण्यासाठी व पुनर्वसनासाठी कृती आराखडा तयार करुन कार्यक्रम राबविण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने अहमदनगर जिल्ह्याप्रमाणे राज्यातील उर्वरित जिल्ह्यांतील जिल्हापरिषदेंद्वारा संपूर्ण सर्व्हेक्षण अभियान राबवून आढळून आलेल्या एकल महिलांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती आदिती तटकरे :** (१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी त्यांच्या स्तरावरुन एकल महिलांचे सर्व्हेक्षण केले आहे. त्यामध्ये १,००,७२६ एकल महिला आढळून आल्या आहेत.
(२), (३), (४) व (५) एकल महिलांच्या पुनर्वसन कार्यक्रमाची रुपरेषा तयार करून कृती आराखडा जाहीर करण्याबाबत शासन स्तरावर घोषणा करण्यात आलेली नाही.

तथापि, विभागाच्या दिनांक २७/०८/२०२१ च्या शासन निर्णय अन्वये राज्यात "मिशन वात्सल्य" योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समन्वय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमार्फत गावातील/ शहरातील कोविड-१९ या आजाराने दोन्ही पालकांचे निधन होऊन अनाथ झालेली बालके व कर्त्या पुरुषांचे निधन होऊन एकल/विधवा महिलांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
(६) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(६४) * १९७०५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या अखत्यारीत जिल्ह्यातील ५३ प्राथमिक आरोग्य केंद्र, २८८ आरोग्य उपकेंद्र आणि जिल्हा सामान्य रुग्णालय यांच्या अधिपत्याखाली रुग्णालयातील रिक्त पदांमुळे जिल्ह्याच्या २६ लाख लोकसंख्येच्या आरोग्यसेवेवर विपरीत परिणाम होऊन अन्य अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर ताण येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणांमध्ये वर्ग एक ते वर्ग चार मधील मंजूर असणाऱ्या २,३८९ पदांपैकी ८६७ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा सामान्य रुग्णालय अंतर्गत सेवा देणाऱ्या रुग्णालयांमध्ये वर्ग १ ची २६ पदे रिक्त आहेत यामध्ये सर्वाधिक रिक्त पदे जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथे असल्याचे निदर्शनास आले असून वर्ग २ च्या मंजूर १२५ पदांपैकी १५ पदे रिक्त आहेत तसेच गट ब मधील नऊ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रिक्त पदामुळे विविध आजारांवर उपचार करण्यासाठी नागरिकांना खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावा लागत असल्याचे निदर्शनास येत असून खाजगी रुग्णालयांमधील उपचारांचा खर्च नागरिकांना परवडण्याजोगा नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने रायगड जिल्ह्यातील शहरी आणि ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणेची विविध रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.
रायगड जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय व त्याच्या अधिपत्याखालील उपजिल्हा रुग्णालये व ग्रामीण रुग्णालये तसेच जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे येथील उपलब्ध वैद्यकिय अधिकारी, विशेषज्ञ व कर्मचारी यांच्यामार्फत सर्व रुग्णांना रुग्णसेवा पुरविण्यात येत आहेत.
(२) हे खरे आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये जिल्हा रुग्णालय व जिल्हा परिषद यांच्या अधिपत्याखाली आरोग्य विभागातंर्गत वर्ग-१ ते वर्ग ४ ची २३९० पदे मंजूर असून त्यापैकी १४१७ पदे भरलेली व ९७३ पदे रिक्त आहेत.
(३) हे अंशत: खरे आहे.

रायगड जिल्हा रुग्णालयातंर्गत सेवा देण्याऱ्या रुग्णालयामध्ये वैद्यकीय अधिकारी, वर्ग-अ (एस-२३) मधील ३४ पदे मंजूर असून यापैकी १३ भरलेली आहेत व २१ पदे रिक्त आहेत. रिक्त पदापैकी

जिल्हा सामान्य रुग्णालय, रायगड येथील १७ पदे रिक्त आहेत. तसेच वैद्यकिय अधिकारी, गट-अ (एस-२०) ची १२५ पदे मंजूर असून त्यापैकी ११८ पदे भरलेली आहेत व ०७ पदे रिक्त आहेत. वैद्यकिय अधिकारी गट-ब ची ३१ पदे मंजूर असून यापैकी १६ पदे भरली व १५ पदे रिक्त आहेत.

(४) हे खरे नाही.

रायगड जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय त्याच्या अधिपत्याखालील उपजिल्हा रुग्णालये व ग्रामीण रुग्णालये येथील उपलब्ध वैद्यकिय अधिकारी व विशेषज्ञांकडून उपचारार्थ आलेल्या सर्व रुग्णांना रुग्णसेवा पुरविण्यात येते. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील रिक्त पदे आहेत अशा ठिकाणी अन्य ठिकाणाच्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना अतिरिक्त कार्यभार देऊन प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णसेवा देण्यात येत आहे.

(५) व (६) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (एस-२३ व त्यावरील) मधील जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, विशेषज्ञ संवर्ग तसेच सामान्य राज्य सेवा या संवर्गातील रिक्त पदांच्या अनुषंगाने सन २०२१ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आलेल्या एकूण ४४४ पदांच्या मागणीपत्रांच्या अनुषंगाने आयोगाकडून २१७ उमेदवारांच्या शिफारशी शासनास प्राप्त झाल्या असून त्यांना नियुक्ती देण्यात आली आहे.

पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने सन २०२१-२२ या निवडसूची वर्षात एकूण ३८२ पदांवर पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे सन २०२२-२३ या निवडसुची वर्षात उपसंचालक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक व विशेषज्ञ संवर्गातील एकूण १९५ रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची प्रक्रिया सुरु आहे.

मवैआसे गट-अ (वेतनस्तर एस-२०) मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांची एकूण ८४४१ पदे मंजूर असून त्यापैकी ६२९० नियमित वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. सद्य:स्थितीत २१५१ नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांपैकी ११४६ पदांवर बंधपत्रित व तदर्थ / कंत्राटी वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत.

सामान्य राज्य सेवा गट-ब मधील दंत शल्य चिकित्सक- २८९, प्रशासकीय अधिकारी- ७३, सांख्यिकी अधिकारी-२३, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी-४९, संजीवनी शास्त्रज्ञ-४ व कनिष्ठ किटक शास्त्रज्ञ -४ अशा एकूण ४४२ पदांच्या जाहिराती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे प्रसिध्द करण्यात आलेल्या असून त्यापैकी प्रशासकीय अधिकारी पदांच्या परीक्षा दिनांक २/१२/२०२२ रोजी ऑनलाईन पध्दतीने झालेल्या आहेत. तसेच सन २०२२-२३ या निवडसूची वर्षात एकूण १४८ रिक्त पदे पदोन्नतीची भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

रागयड जिल्ह्यासह राज्यातील लिपिकवर्गीय रिक्त पदांची पदभरती परीक्षा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस बरोबर भरती प्रक्रिया करारनामा करण्यात आला आहे तर जिल्हा परिषद अधिपत्याखालील पदभरतीसाठी IBPS कंपनीसोबत करार करण्यात आला आहे.

-----------------

## मौ. पिंपळा (बु.) (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) येथील जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापकाने शिक्षकांच्या वेतनाच्या रकमेत अपहार केल्याबाबत

**(६५) * २००२३ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.पिंपळा (बु.)(ता.तुळजापुर, जि.उस्मानाबाद) येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांच्या वेतनातून दरमहा आयकर भरणा (इन्कम टॅक्स) करण्यासाठी ठराविक रक्कम कपात करुन सदर रक्कम शाळेच्या मुख्याध्यापकांच्या बँक खात्यात जमा करण्यात येऊन त्यातून नियमित प्रक्रियेनुसार दरवर्षी माहे मार्च अखेरीस आयकर भरणा केला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन मुख्याध्यापक यांनी त्याच्या खात्यात आयकर भरण्यासाठी सर्व शिक्षकांकडून जमा करण्यात आलेली रक्कम रुपये ३ लाख २० हजार आयकर खात्याकडे न भरताच अपहार केला असल्याचे दिनांक २ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी विद्यमान मुख्याध्यापक यांनी पूर्वीच्या कार्यरत मुख्याध्यापकांविरुध्द दिनांक ३१ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास गट शिक्षणाधिकारी यांचेकडे लेखी स्वरुपात तक्रार केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४)असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रकरणी दोषी असणाऱ्या तत्कालीन मुख्याध्यापकांकडून सदर रक्कम वसूली करुन त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) तत्कालीन मुख्याध्यापक श्री.राजकुमार माणिकशेट्टी यांनी त्याच्या खात्यात आयकर भरण्यासाठी सर्व शिक्षकांकडून जमा करण्यात आलेली रक्कम रुपये ३ लाख २१ हजार आयकर खात्याकडे न भरताच अपहार केला असल्याची बाब निदर्शनास आली आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) प्रस्तुत प्रकरणाची संयुक्त चौकशी करण्यात आली. त्यात तत्कालीन मुख्याध्यापक श्री.माणिकराव शेट्टी यांनी शिक्षक आयकर भरणाची रक्कम रुपये ३,२१,०००/- इतकी नियमबाह्य उचलल्याचे निदर्शनास आले. त्यानुषंगाने संबंधित मुख्याध्यापकास सदरची रक्कम तात्काळ भरण्याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. तद्नंतर संबंधित तत्का. मुख्याध्यापक श्री.माणिकराव शेट्टी यांनी दिनांक १०/०४/२०२३ व दिनांक ११/०४/२०२३ रोजी अनुक्रमे रुपये १,५०,०००/- व रुपये १,६८,०००/- अशी एकूण-३,१८,०००/- भरणा केलेली आहे. उर्वरीत रुपये ३०००/- च्या भरणाबाबत संबंधित तत्का. मुख्याध्यापकास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. सबब, सदर अपहार प्रकरणाच्या अनुषंगाने तत्का. मुख्याध्यापक यांच्याविरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम-१९६४ मधील तरतूदीनुसार कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील मेळघाट अंतर्गत धारणी, चिखलदरा येथे रक्तपेढी व रक्त साठविण्यासाठी आवश्यक अद्ययावत यंत्रणा उपलब्ध करुन देणेबाबत

**(६६) * १९४२९ श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील मेळघाटअंतर्गत धारणी, चिखलदरा येथे रक्तपेढी व रक्त साठविण्यासाठी आवश्यक अद्ययावत यंत्रणा उपलब्ध नसल्याने नियमितरित्या डायलिसीस व शस्त्रक्रिया करतांना गरीब रुग्णांना बाहेरून रक्ताची वेळेवर व्यवस्था करावी लागत असल्याची बाब माहे मे,२०२३ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेळघाटमधील ग्रामीण रुग्णालयात औषधांचा तुटवडा तसेच सोनोग्राफी मशिन, एक्स रे मशिनचा अभाव, रेडीओलॉजीस्टचे रिक्त पद, बंद अँब्युलन्स इ.बाबतच्या तक्रारी आदिवासी भागातून येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमरावती शहरातील सुपर स्पेशालीटी रुग्णालयात सन २०१५ पासून मंजूर असलेली रक्तपेढी अद्यापही सुरु झाली नसल्याची गंभीर बाब माहे मे, २०२३ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, धारणी व चिखलदरा (जि.अमरावती) या ग्रामीण रुग्णालयात ब्लड बँक व रक्त साठविण्यासाठी आवश्यक अद्ययावत यंत्रणा उपलब्ध करून देण्याबाबत तसेच अमरावती शहरातील सुपर स्पेशालीटी रुग्णालयात रक्तपेढी सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. प्रशामा-१२२३/प्र.क्र.१४९/आ-८, दिनांक ४/०७/२०२३ अन्वये सुपर स्पेशालिटी रुग्णालय, अमरावती येथील रक्तपेढी करीता लागणारी वैद्यकीय उपकरणे व साहित्य सामुग्री खरेदी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता शासनाकडून मिळालेली आहे.

-----------------

## महिला व शिशू रुग्णालय, जालना रोड (जि.औरंगाबाद) येथील इमारतीच्या बांधकामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६७) * १८८४२ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक १८१३४ ला दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील महिला रुग्णालयाचे बांधकामासाठी निधी नसल्यामुळे गत ६ महिन्यापासून काम बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद जिल्ह्यात २०० खाटांचे महिला रुग्णालय स्थापन करण्यासाठी सन २०१३ मध्ये निर्णय घेण्यात येऊन ११० कोटी रुपयांच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१३ मध्ये मंजूर झालेले महिला रुग्णालयाचे व कर्मचारी निवासस्थानाचे सन २०२१ मध्ये सुरु झालेले बांधकाम माहे नोव्हेंबर २०२३ मध्ये पूर्ण करण्याची मुदत होती तथापि, इमारतीचे फक्त ४० टक्के काम पूर्ण झाले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उर्वरित कामासाठी बांधकाम विभागाने माहे जाने, २०२३ मध्ये रुपये १६ कोटी निधी मिळणेसाठी सादर केलेल्या प्रस्तावावर शासनाकडून अद्याप कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने रुग्णालयाचे काम पूर्ण करण्यासाठी निधीची तरतुद करणे, पदनिर्मिती करणे व वैद्यकीय यंत्रसामुग्री खरेदी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) नाही.
(२) नाही.
(३) सदरचे काम दिनांक २७/०५/२०२१ रोजी सुरु झाले असून मुदत दिनांक २६/११/२०२३ पर्यंत आहे. सद्यास्थिती भौतिकदृष्ट्या ५० टक्के काम पूर्ण झाले आहे.
(४) सदर इमारत बांधकामास निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.
(५) रुग्णालयाचे बांधकाम ७५ टक्के पूर्ण झाल्यानंतर पदनिर्मिती, यंत्रसामुग्री व साहित्य सामुग्री खरेदी बाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## वरळी येथील रा.आ.पोद्दार आयुर्वेद महाविद्यालयाच्या आवारात अपघातग्रस्त विद्यार्थ्याला तातडीने उपचार न मिळाल्याबाबत

**(६८) * १८९२३ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी येथील आर.ए.पोद्दार आयुर्वेद महाविद्यालयातील तृतीय वर्षात शिकत असलेल्या एका विद्यार्थ्याचा महाविद्यालयाच्या परिसरातील आंब्याच्या झाडावरून पडून मृत्यू झाला असल्याची घटना दिनांक २७ एप्रिल, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू घटनेची दखल घेऊन घटनेच्या चौकशीसाठी वैद्यकीय शिक्षण विभागाने दोन अधिष्ठातांची समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, सदरहू समितीने अहवालात केलेल्या शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, तदनुषंगाने संबंधित मृत विद्यार्थ्यास तातडीने वैद्यकीय उपचार उपलब्ध करुन देण्यात हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे.

(२) आयुष संचालनालयाने दिनांक २७/०४/२०२३ च्या आदेशान्वये द्विसदस्यीय समिती नेमली होती.

(३) समितीने आयुष संचालनालयास सादर केलेल्या अहवालानुसार अपघातग्रस्त विद्यार्थ्याच्या उपचारात कोणताही हलगर्जीपणा झाल्याचे दिसून येत नाही.

मात्र अशा प्रकारच्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता आयुष संचालनालयाने दिनांक ०५/०७/२०२३ च्या परिपत्रकान्वये आयुष संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व आयुर्वेद व होमिओपॅथीक महाविद्यालयातील अधिष्ठाता यांना त्यांचे स्तरावर विद्यार्थ्यांना समुपदेशन, मार्गदर्शन, त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी बैठका घेवून प्रयत्न करणे, प्रशासकीय उपाययोजना करणे या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत व योग्य ती दक्षता घेण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

(४) अपघातग्रस्त विद्यार्थ्यांच्या उपचारात हलगर्जीपणा झाला नसल्याचा निष्कर्ष समितीने काढला असल्याने या अनुषंगाने कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंधुदूर्ग जिल्ह्यातील मौजे धामापूर (खालचावाडा) ते आंबेरी (ता.मालवण) दरम्यानच्या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(६९) * १९११३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धामापूर (खालचा वाडा) ते आंबेरी (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) या ६.५ कि.मी. लांबीच्या ग्रामीण मार्ग क्रमांक ४०२ या रस्त्याच्या मजबुतीकरणासह डांबरीकरणासाठी शासनाने माहे डिसेंबर, २०२१ अखेर ४३०.३५ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देऊन सा.क्र.०/०० ते १/५०० मधील रस्ता दुरुस्तीचे काम विविध योजनेंतर्गत प्राधान्याने प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषद, सिंधुदूर्ग (सा.बां.) यांना सूचना देऊनही काम अद्यापपर्यंत हाती न घेतल्याने अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकृष्ट बांधकामामुळे उपरोक्त सा.क्र.०/०० ते १/५०० मधील रस्त्याला खड्डे पडलेले असून संपूर्ण रस्त्याच्या पृष्ठभागावरील खडी, डांबर अतिवृष्टीने वाहून गेल्याने रस्ता वाहतुकीकरीता धोकादायक झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त सा.क्र.०/०० ते १/५०० मधील रस्त्याच्या मजबूतीकरणासह डांबरीकरणाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे तसेच ग्रामा-४०२ रस्त्यावरील ०/०० ते १/८०० लांबीचा डांबरी पृष्ठभाग खराब झाला असून सदर रस्त्याचे नुतनीकरण करणे आवश्यक असून सदरचे काम जिल्हा परिषदेस रस्ते दुरुस्तीच्या विविध योजनांतर्गत प्राप्त होणाऱ्या अनुदानातून प्राथम्याने हाती घेण्याच्या दिलेल्या सूचनेच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, मौजे धामापूर (खालचावाडा) ते आंबेरी या संपूर्ण रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-१ अंतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पॅकेज क्रमांक SIN-१४ मधील चौके बावखोल आंबेरी धामापूर रस्ता (ता.मालवण) या रस्त्याच्या ६.५ कि.मी. लांबीच्या व रुपये ४३०.३५ लक्ष किंमतीच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामामध्ये ग्रामा-४०२ (१/८०० ते ३/००=१.२ कि.मी.) व ग्रामा-४०८ (०/०० ते ५/३००=५.३ कि.मी.) अशी लांबी समाविष्ट आहे.

प्रस्तुत कामामध्ये ग्रामा-४०२ रस्त्याची सा.क्र.०/०० ते १/५०० ही लांबी समाविष्ट नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) रस्ते विकास आराखडा सन २००१-२०२१ नुसार धामापूर हरिजनवाडी ते आंबेरी हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.४०२ दर्जाचा आहे. सदर रस्त्याची एकूण लांबी ३.५० कि.मी. असून अस्तित्वातील लांबी ३.०० कि.मी. इतकी आहे.

सदर रस्त्याच्या सा.क्र. ०/०० ते १/८०० मधील लांबी डांबरी पृष्ठभागाची असून नादुरुस्त आहे. सदर लांबीच्या दुरुस्तीचे काम जिल्हा वार्षिक योजना प्रारुप आराखडा सन २०२३-२४ मध्ये जिल्हा परिषदेमार्फत प्रस्तावित करण्यात आले आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार सदरचे काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

सा.क्र.१/८०० ते ३/०० मधील लांबीचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत फेब्रुवारी-२०२० मध्ये पूर्ण झाले असून सदर लांबी सुस्थितीत व वाहतुकीस योग्य आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील वागळे इस्टेट परिसरातील कामगार रुग्णालयाचे नुतनीकरण करण्याबाबत

**(७०) * १९५५९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाण्यातील जिल्हा शासकीय रुग्णालयाची पुनर्बांधणी करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाने मंजूर केला असून इमारतीची पुनर्बांधणी, आवश्यक दुरुस्ती तसेच इतर सुविधांसाठी कोट्यवधी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, सदर ठिकाणी दाखल होणाऱ्या रुग्णांची वागळे इस्टेट परिसरातील कामगार रुग्णालयात तात्पुरती सोय केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामगार रुग्णालयाची इमारत अतिधोकादायक घोषित करुन सात वर्षे एवढा कालावधी होऊनही उक्त धोकादायक इमारतीतील दोन मजल्यांवर बाह्य रुग्ण विभाग (ओपीडी) सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वागळे इस्टेट परिसरातील कामगार रुग्णालयात बंद उद्वाहन, कोंदट आणि प्लास्टर निखळलेला शस्त्रक्रिया कक्ष, पापुद्रे निघालेल्या भिंती, पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य अशा समस्यांना सामोरे जावे लागत असून, शासकीय रुग्णालयातील रुग्णांचा अतिरिक्त भार सदर कामगार रुग्णालयामध्ये सामावून घेण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली आहे,
(४) असल्यास, सदर रुग्णालयात दोन लाख कामगारांची विमा कार्ड आहेत, तसेच या रुग्णालयातील शस्त्रक्रिया विभाग सन २०१४ पासून बंद असून अनेक पदे रिक्त असल्यामुळे येथील कामगार रुग्णांना उपचारांसाठी मुलुंड येथील रुग्णालयात जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, हे रुग्णालय ७३ हजार १९५ चौरस फूट इतक्या विस्तीर्ण क्षेत्रफळावर असले तरी सोयी सुविधांअभावी ते निरुपयोगी ठरत आहे, अशी येथील कामगारांची तक्रार असून यासंबंधी रुग्णालय व्यवस्थापनाने कामगार रुग्णालयातील दुरुस्तीची कामे करण्यासंबंधीच्या केलेल्या कामाचे स्वरुप व सद्य:स्थिती काय आहे,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने संबंधित रुग्णालयाच्या बांधकाम व दुरुस्तीसह सदर रुग्णालय नव्या जागी स्थलांतरीत करण्यासंदर्भात तसेच रुग्णालयातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयातील रुग्णांना कामगार रुग्णालयात स्थलांतरीत करण्याबाबतची कोणतीही प्रक्रिया करण्यात आलेली नाही.

(२) हे खरे नाही, स्ट्रक्चरल ऑडिट रिपोर्टनुसार प्रशासकीय इमारतीच्या दोन मजल्यापर्यंतचे बांधकाम दुरुस्त करण्यात आलेले आहे. त्यानुसार कामगार रुग्णालयाच्या तळमजल्यावर रुग्णांसाठी बाह्य रुग्ण विभाग व दुसऱ्या मजल्यावर दोन आंतररुग्ण विभाग सुरु करण्यात आलेले आहेत.

(३) ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयातील रुग्ण कामगार रुग्णालयात स्थलांतरीत झालेले नसल्याने कामगार रुग्णालयावर अतिरिक्त भार पडण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

कामगार रुग्णालयातील उद्ववाहन सुरु करण्यात आलेले आहे, शस्त्रक्रिया कक्षाच्या दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले आहे तसेच त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आलेली आहे

(४) या रुग्णालयाच्या अखत्यारीतील सेवा दवाखान्यात अंदाजे ७,००० विमाधारकांच्या कार्डांची नोंद आहे. तसेच रुग्णालयाशी संलग्न क्षेत्रातील २७,००० विमाधारकांच्या कार्डांची नोंद आहे.

रुग्णालयातील शस्त्रक्रिया कक्षात पुरेशी यंत्र सामुग्री उपलब्ध नसल्याने शस्त्रक्रियेसाठी नजीकच्या मुलुंड रुग्णालयात पाठविण्यात येते. रुग्णालयातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात आलेली आहेत.

(५) व (६) या रुग्णालयातील पॅथॉलॉजी, एक्स-रे, ईसीजी सेवा सुरु आहेत. मेडिसीन, अस्थिव्यंगरोग, नेत्ररोग, स्त्रीरोग, बालरोग, शल्य चिकित्सक, कान, नाक घसा, त्वचारोग विभाग व अपघात विभाग कार्यान्वित आहेत.

सदर रुग्णालयाचा परिसर हा क्षेत्रिय कार्यालय, कर्मचारी विमा महामंडळ यांच्या अखत्यारीत असून त्या अनुषंगाने विशेष दुरुस्तीची कामे क्षेत्रिय संचालक यांच्यामार्फत करण्यात येत आहेत.

सदर रुग्णालय नव्या जागी स्थलांतरीत करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. सदर रुग्णालयातील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात आलेली आहेत.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनांची कामे सुरु झाली नसल्याबाबत

**(७१) * १९२६९ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील १४०० पाणीपुरवठा योजनांपैकी सुमारे ३७० पाणीपुरवठा योजनांची कामे सुरु असून, मुक्ताईनगर, बोदवड व रावेर तालुक्यातील जवळपास १०० पाणीपुरवठा योजनांची कामे मंजूर असूनही अद्याप सुरु झालेली नसल्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ८ मे २०२३ रोजी वा त्यादरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी, जळगाव यांचेकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर योजनांची कामे तातडीने सुरु करणे कामी कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

जळगाव जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत एकूण १३५४ पाणीपुरवठा योजना मंजूर असून, मुक्ताईनगर, बोदवड व रावेर तालुक्यातील अनुक्रमे २४, १४ व २३ कामे दिनांक ०८ मे २०२३ दरम्यान सुरू नव्हती. याबाबत लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) जळगाव जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनांचे ई-भुमीपुजन करण्यात आलेले आहे. परंतु, काही ठिकाणी (अ) ग्रामपंचायतीने तसेच ग्रामस्थांनी उद्भव व टाकीची जागा बदलविणेबाबतची मागणी (ब) ग्रामपंचायतीने जागा उपलब्ध करून दिली नाही. (क) काही ठिकाणी स्त्रोत बदलवून देण्याविषयी वा अंदाजपत्रकाव्यतिरिक्त काही कामे वाढीव करणे विषयी मागणी, (ड) कंत्राटदाराकडून विलंब अशा कारणांमुळे काही ठिकाणी काम सुरु झालेले नव्हते. तरी सदर योजनेची कामे तातडीने सुरु करुन मुदतीत पूर्ण करणेबाबत संबंधित मक्तेदारांना लेखी/तोंडी सुचना करण्यात आलेल्या आहेत. तसेच कंत्राटदाराकडून झालेल्या विलंबाबाबत मुक्ताईनगर, बोदवड व रावेर तालुक्यातील कंत्राटदारांना दंड आकारणीबाबत नोटीस देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुट्टीबोरी (जि.नागपूर) येथील ईएसआयसी अंतर्गत मंजूर रूग्णालयाचे प्रलंबित बांधकाम सुरु करणेबाबत

**(७२) * १९३२० श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुटीबोरी(जि.नागपूर) येथे आशियातील सर्वात मोठी व पंचतारांकीत सुविधायुक्त औद्योगिक वसाहत असून कामगारांची संख्या व त्यांच्या आरोग्याची समस्या लक्षात घेता १० वर्षांपूर्वी २०० खाटांचे ईएसआयसी अंतर्गत अद्ययावत रूग्णालय मंजूर करून निधी उपलब्ध करून दिलेला होता, परंतु प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे बांधकाम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयाचे बांधकाम प्रलंबित असल्याने कामगारांना वेळेवर उपचार मिळत नसल्यामुळे असंख्य कामागारांचा मृत्यू होत असल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय ?

(३) असल्यास, बुटीबोरी येथील दिनशॉ कंपनीतील एका कामगाराला ईएसआयसीने रेफर केलेल्या रुग्णालयाचे मागील प्रलंबित देयक न दिल्यामुळे उपचार करण्यास संबंधित रूग्णालयाने नकार दिल्याने उक्त कामागाराचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तातडीने सदर रुग्णालयाचे बांधकाम सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) अंशत: खरे आहे, बुटीबोरी (जि.नागपूर) येथे राकावि महामंडळ, श्रम मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या मार्फत २०० खाटांचे रुग्णालय उभारण्यात येत आहे. सदर बांधकामासाठी रुपये १९.२४ कोटी इतका निधी दिनांक २४/०८/२०२२ च्या आदेशान्वये वितरीत करण्यात आला असून, केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील कर्मचारी राज्य विमा महामंडळामार्फत सदर रुग्णालयाचे बांधकाम दिनांक १४/१२/२०२२ पासून सुरु करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही, बुटीबोरी, नागपूर येथे क्र.१ व क्र.२ अशी दोन सेवा दवाखाने कार्यरत असून, त्यामार्फत बुटीबोरी येथील विमेदार कामगार व त्यांच्या कुटुंबियांना प्राथमिक आरोग्य सेवा पुरविण्यात येते. तसेच सेकंडरी केअरची सुविधा राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, नागपूर यांच्यामार्फत पुरविण्यात येते.

(३) विमेदार रुग्णांना अत्यावश्यक परिस्थितीत विशेष वैद्यकीय उपचार उपलब्ध होण्याकरीता कर्मचारी राज्य विमा महामंडळाने खाजगी रुग्णालयांशी टाय-अप केलेले असून, त्यांची देयके महामंडळामार्फतच अदा करण्यात येतात. परंतु, रेफर केलेल्या रुग्णाचा टाय-अप केलेल्या रुग्णालयाने उपचार करण्यास नकार दिल्याने रुग्णाचा मृत्यू झाल्याबाबतची तक्रार वा नोंद रुग्णालयाच्या वा महामंडळाच्या अभिलेख्यात आढळुन आलेली नाही.

बुटीबोरी (जि.नागपूर) येथे २०० खाटांचे रुग्णालयाचे इमारत बांधकाम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सर जे.जे. समुह रुग्णालय, मुंबई येथील नेत्रचिकित्सा विभागातील विद्यार्थी/ डॉक्टरांनी केलेल्या आंदोलनाबाबत

**(७३) * २००२६ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर जे.जे. समुह रुग्णालय, मुंबई येथील नेत्रचिकित्सा विभागातील विद्यार्थ्यांना/ डॉक्टरांना शस्त्रक्रियेच्या संधी उपलब्ध होत नसून संशोधन कार्याचा अभाव व निवासी डॉक्टरांना देण्यात येणारी गैरवागणूक इत्यादी तक्रारींसह उक्त विभागाचे कामकाज एनएमसीच्या निदेशानुसार चालवावे अशी मागणी करुन नेत्रचिकित्सा विभागाच्या ७५० विद्यार्थ्यांनी/डॉक्टरांनी दिनांक ३१ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास बेमुदत आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सर जे.जे.समूह रुग्णालयाच्या अधिष्ठाता यांनी सदर प्रकरणी नियुक्त केलेल्या चौकशी समितीचा निर्णय हा एकतर्फी असल्याचे सांगून त्याविरोधात विभाग प्रमुख,नेत्रचिकित्सा विभाग तसेच संचालक व मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र कार्यक्रम प्रमुख यांच्यासह अन्य ९ डॉक्टरांनी आपले राजीनामे त्याचदिवशी शासनास सादर केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर चौकशी समितीने आरोपी डॉक्टरांना खुलासा करण्याची संधी न देताच केवळ निवासी डॉक्टरांच्या प्रतिक्रियांवर एकतर्फी अहवाल शासनास सादर केला असा आरोप रुग्णालय प्रशासनावर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर एकतर्फी अहवालानुसार आरोपी डॉक्टरांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

९ डॉक्टरांनी वैयक्तीक कारणास्तव राजीनामे शासनास सादर केले आहेत.

(३) व (४) हे खरे नाही.

अशा प्रकारची कोणतीही तक्रार रुग्णालय प्रशासनाकडे प्राप्त नाही. तसेच ९ डॉक्टरांचे वैयक्तीक कारणास्तव देण्यात आलेले राजीनामे दिनांक ०३/०६/२०२३ रोजी स्वीकारण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेत मनोविकारांचा समावेश करणेबाबत

**(७४) * २०४९१ श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोविकार पिडीत रुग्णांना विम्याचा लाभ देण्यात यावा असे मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असतानाही राज्यात खाजगी विमा कंपन्यांकडून मनोविकार रुग्णांना विम्याचा लाभ दिला जात नसल्याची बाब माहे जून, २०२३ च्या पाहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत डिप्रेशन, डिसअसोसिएटिव्ह डिसऑर्डर, एंग्झायटी डिसऑर्डर आणि डिमेंशिया या मनोविकारांचा समावेश करावा अशी मागणी लोकप्रतिनिधीद्वारे शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश व नवीन मानसिक क्षमता (मेंटल ॲक्ट) कायद्याचे पालन करण्यासाठी महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनांची पडताळणी करण्यासाठी समिती नेमण्यात आली आहे काय, असल्यास सदर योजनेत समावेश असलेल्या मनोविकार योजनांवर होणाऱ्या खर्चाचा आराखडा समिती मार्फत तपासून पुन्हा नव्याने आवश्यक त्या उपचारांचा यामध्ये समावेश करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) रुग्णांना आरोग्य विमा आणि ग्रुप विमा देणाऱ्या विमा कंपन्या ह्या IRDA (insurance regulatory and development authority) संस्थेच्या अखत्यारीत येतात. IRDA (insurance regulatory and development authority) ही संस्था केंद्र शासनाच्या अखत्यारीत येते.
(२) हे खरे नाही.
(३) सध्या एकत्रित योजनेमध्ये मनोविकाराकरीता एकूण ५ उपचार प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या लाभार्थ्यांसाठी व त्यातील चार उपचार महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेत उपलब्ध आहेत.

सुधारित एकत्रित योजनेंतर्गत एकूण ६ मानसिक आरोग्यांवरील आजारांचा समावेश करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (का.),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.